गुरुवार, १७ नोव्हेंबर २०२२

⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -९७

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 17 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-97 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


## विठुरायाला उबदार पोशाख



सध्या राज्यभर थंडीचा कडाका वाढत असून ऋतुमानानुसार विठुरायाला उबदार पोशाख परिधान करण्यात आला आहे. कार्तिकी यात्रेच्या प्रक्षाल पूजेनंतर दुसऱ्या दिवशी दरवर्षी विठूरायाला उबदार पोशाख परिधान करण्यात येतो. साधारण होळीपर्यंत हे उबदार कपडे विठ्ठल-रुखुमाईला घालण्यात येतात.

## प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारा

### छत्रपती संभाजीराजेंची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी अफजलखानाच्या कबरीच्या आसपासची अतिक्रमणे हटवण्यात आली होती. त्यानंतर आता गडावर छत्रपती शिवाजी महाराज अफजलखानाचा कोथळा (शिवप्रताप स्मारक) काढतानाचा पुतळा उभारण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यावर संभाजीराजे छत्रपती यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

सरकारने अतिक्रमण काढण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. विशालगड आणि लोहगडावरील सुद्धा अतिक्रमण काढण्यासाठी सूचित केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज अफजलखानाचा कोथळा काढतानाचा पुतळा उभारण्याचा निर्णय ही कौतुकाची बाब आहे. पण, तिथे शिवाजी महाराज यांचे स्मारक उभे राहायला हवे, अशी मागणी संभाजीराजे यांनी सरकारकडे केली आहे. हे स्वराज्य उभे करताना शिवाजी महाराजांना किती अडचणी आल्या. अफजलखानला युद्धनीतीच्या माध्यमातून प्रतापगडला कसे आणले. कौशल्याच्या माध्यमातून अफजलखानचा कोथळा काढला, या गोष्टी या स्मारकामध्ये दाखवायला हव्या. इतिहास आणि पार्श्वभूमी स्मारकात नमूद होणे गरजेचे आहे, असेही संभाजीराजे यांनी सांगितले. रायगड किल्ल्याचा पुनर्विकास सुरु आहे. यावर संभाजीराजे यांनी म्हटले की, रायगडचे संवर्धन आणि जतन हे आव्हानात्मक काम आहे. पण अडचणींतून मात करणे या मताचा आहे. सरकारच्या पैशांची अडचण नाही. पण त्यासाठी सरकार आणि पुरातत्व खात्याच्या परवानग्या मिळवणे आव्हानात्मक आहे, असेही संभाजीराजे म्हणाले.



### महत्वाची बातमी

## भारतीयांसाठी ऋषी सुनक यांची मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**बाली :** इंडोनेशियामधील बाली येथे आयोजित करण्यात आलेल्या जी-२० परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच ब्रिटनच्या पंतप्रधानपदी नियुक्त झालेले भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ब्रिटन सरकारने भारतीयांसाठी दरवर्षी ३००० व्हिसा जारी करण्याची घोषणा केली आहे. ब्रिटनमध्ये करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांसाठी यामुळे मोठी संधी उपलब्ध झाली आहे. ब्रिटन सरकारने या योजनेचा फायदा मिळणारा भारत पहिला देश असल्याचं सांगितलं आहे. या निर्णयामुळे युके-भारत यंग प्रोफेशनल स्कीमवर शिक्कामोर्तब झालं असल्याचं ब्रिटन सरकारने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी १८ ते ३० वयोगटातील ३००० प्रशिक्षित तरुण दोन वर्षांसाठी ब्रिटनमध्ये वास्तव्य आणि नोकरी करु शकतात. या योजनेमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील असा विश्वास ब्रिटन सरकारने व्यक्त केला आहे.

## अनोळखी मोबाईल नंबरपासून सुटका

### भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अमंलात आणतेय नवी सुविधा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण म्हणजेच ट्रायकडून आता लवकरच एक महत्वाची सेवा सुरु केली जाणार आहे. त्याद्वारे तुमची अनोळखी मोबाईल नंबरपासून सुटका होणार आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला अनेक वेळा अनोळखी नंबरवरुन आलेले कॉल उचलण्याचा कंटाळा येतो. तर काहीना अनोळखी नंबरची भीती देखील वाटते. मात्र, आता सरकारकडून एक अशी सुविधा अमंलात आणली जाणार आहे.**



त्यामुळे तुमची अनोळखी नंबरपासून सुटका होणार आहे. कारण, आता जो व्यक्ती तुम्हाला कॉल करेल त्याचे नाव मोबाईल फोनमध्ये सेव केलेले नसले तरीही ते तुम्हाला दिसणार आहे. या योजनेअंतर्गत आता जर एखाद्या व्यक्तीला नवीन सिमकार्ड घ्यायचे असेल तर त्यासाठी भरण्यात येणारा केवायसी (KYC) फॉर्मवर त्याला स्वतःची सर्व खरी माहिती भरावी लागेल. शिवाय त्या फॉर्मवर सिम कार्ड वापरकर्त्याचे जे नाव असेल तेच नाव त्या व्यक्तीने इतरांना कॉल केल्यावर दिसणार आहे. ट्रायच्या या उपक्रमामुळे अनेक जणांची अनोळखी नंबरमुळे होणाऱ्या त्रासापासून सुटका होणार आहे. अनोळखी नंबरवरुन आलेल्या कॉलमुळे अनेक लोकांची आर्थिक फसवणूक झाल्याची उदाहरणं आपण पाहिली आहेत. त्यामुळे आता अनोळखी नंबरवरुन लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर काही प्रमाणाक आळा बसणार आहे. दरम्यान, सध्या देखील आपल्याला अनोळखी नंबर कोणाचा आहे हे पाहता येतं. त्यासाठी आपण सारख्या ॲप्सचा वापर देखील करतो. मात्र सारखी ॲप्स तुमच्या मोबाईलमधील डाटा विकण्याची शक्यता असते. शिवाय आजकाल ही ॲप्स तुमच्याकडून ते देत असलेल्या सेवेचे मुल्य देखील आकारतात. तर या ॲप्सद्वारे मिळणारी माहिती देखील पुर्णपणे खरी असेल असा दावा करता येत नाही. त्यामुळे आपली काही प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता असतेच. मात्र, सध्या ट्रायद्वारे केवायसी आधारित जी सेवा सुरू करण्यात येणार आहे त्याद्वारे ग्राहकांना १०० टक्के अचूक माहिती मिळणार आहे.

## शिवसेनेने २०१४ मध्ये फक्त चार जागांसाठी युती तोडली


### देवेंद्र फडणवीस; अमित शाह यांच्यावर आधारित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजप तयार असतानाही शिवसेनेने २०१४ मध्ये फक्त चार जागांसाठी युती तोडली आणि बेईमानी केली. त्यावेळी भाजप पक्ष कमी जागा घेण्यासाठी तयार होता. तरीही शिवसेनेने टोकाची भूमिका घेत युती तोडली. मात्र, आम्ही त्या निवडणुकीत शिवसेनेला त्यांची जागा दाखवून दिली, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबईत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपा नेते अमित शाह यांच्यावर आधारित एका पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना-भाजप युती कशी तुटली, याबाबतचा किस्सा सांगितला. महाराष्ट्रातील २०१४ च्या निवडणुकीत आपण शिवसेनेसह युती करण्यास तयार होतो. आपण कमी जागा लढण्यासही तयार होतो. पण केवळ चार जागांसाठी शिवसेनेने युती तोडली. अचानक युती तुटल्यानंतर वर्षानुवर्ष ११७ जागा लढणारा भाजपा, एका दिवसात २८८ जागा लढण्यास तयार झाला. याचे एकमेव कारण म्हणजे अमित शाह आपल्या पाठीशी उभे होते. दोन महिने अमित शाह महाराष्ट्रात येऊन राहिले. निवडणुकीचं तंत्र त्यांनी आपल्याला शिकवले, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी देवेंद्र फडणवीस राज्यातील सत्तांतराबाबतही भाष्य केले. बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप हे दोन्ही पक्ष एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात एकत्र आले याचे श्रेयही अमित शाह यांनाच जाते. या सगळ्या काळात अमित शाह आमच्यासोबत भक्कमपणे उभे होते, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. शिवसेनेने युती तोडल्यानंतर महाराष्ट्रात भाजप पक्ष पहिल्यांदाच स्वबळावर विधानसभा निवडणुकीला सामोरा गेला. अमित शाह यांच्या नेतृत्वात आपण उत्तम प्रकारे निवडणूक लढलो. दोन-अडीच महिने ते महाराष्ट्रात राहिले. याच कार्यालयात ते मुक्काम करायचे, दिवस घालवायचे. निवडणुकीत सगळ्या प्रकारची मदत त्यांनी केली. निवडणुकीतील अनेक गोष्टी, तंत्र त्यांनी आपल्याला शिकवले. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपाने पहिल्यांदाच स्वतःचं सरकार स्थापन केले. यामध्ये अमित शाह यांचा सिंहाचा वाटा आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज आणि चाणक्य ही दोन व्यक्तिमत्त्व अमित शाहा यांचे प्रेरणास्थान आहेत. अमित शाह हे एक संवेदनशील मनाचे नेते आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# फिटे अंधाराचे जाळे

मी त्यांना म्हणालो, ' काका, मला वल्लरीबद्दल, तिच्या प्रगतीबद्दल, तुम्ही केलेल्या प्रयत्नांबद्दल अधिक जाणून घ्यायला आवडेल. ' तसे ते म्हणाले, ' अहो विश्वासराव, आपण मी लिहिलेले ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तक वाचा. त्यात आपल्याला सगळी माहिती मिळेल. ' मी त्यांना म्हटले, ' मी आमच्या वाचनालयात हे पुस्तक उपलब्ध आहे का ते बघतो, नसेल तर पुण्याहून मागवून घेतो. ' यावर ते म्हणाले, ' तुमचा पत्ता कळवा. मी पुस्तक पाठवतो. ' आश्चर्य म्हणजे तीनचार दिवसांनी मला त्यांनी पाठवलेले पुस्तक मिळाले सुद्धा ! त्या पुस्तकावर त्यांनी छानशी स्वाक्षरी करून लिहिले होते, ' विश्वासरावांना आवडेलच या विश्वासाने.' ते सगळं पाहून माझा त्यांच्याविषयीचा आदर आणखीनच दुणावला.

करमरकर काकांशी बोलताना ते ज्या परिस्थितीतून जात आहेत त्याचा अंदाज मला आला होता. करमरकर काका आणि काकू दोघेही वयोवृद्ध.



एकुलतं एक अपत्य म्हणजे वल्लरी. तीही चारचौघींसारखी सामान्य नाही. वल्लरी आता पन्नास वर्षांची झालीय. आपण सामान्य माणसे आपल्याच फूटपट्ट्या लावून सगळ्यांना मोजत असतो. तसाच मीही विचार करायला लागलो. कोण बरं सांभाळेल आता यांना या वयात ? म्हातारपणाची काठी ज्याला आपण म्हणतो असा मुलगा नाही. अर्थात मुली पण हल्ली मुलांपेक्षा काही कमी नाहीत. पण इथे तर सारेच विपरीत ! आईवडिलांची काळजी घेण्याऐवजी या मुलीचीच काळजी त्यांना घ्यावी लागते. घरामध्ये तिघेच राहतात. जेवणाचा डबा शेजारून येतो. पण निराशा, दुःख, हताशपणाचे उद्गार ? छे ! निराशा, दुःख, उद्वेग कुठेही नाही. दैवाला दोष देणे नाही. करमरकर काका भरभरून बोलले. आपल्या बोलण्यातून आनंद, दुःख, विषाद या सारख्या भावना सहजपणे समोरच्या व्यक्तीला लक्षात येतात. पण इथे तर करमरकर काकांच्या बोलण्यातून आनंदच झिरपत होता. तो थेट माझ्या हृदयापर्यंत पोहोचला. मी मनाशी म्हटले, ' अरे बघ, आपण किती साध्या साध्या गोष्टींवरून चिडचिड करतो, वैतागतो, दैवाला दोष देतो. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# आयुष्यातील वेळेच्या नियोजनाचे महत्व

आधुनिक केसरी

वेळेचे चांगले व्यवस्थापन आपल्या क्रियाकलापांचे नियोजन, रेकॉर्डिंग आणि प्रतिबिंबित करण्यावर अवलंबून असल्याने, आपण ते करण्यासाठी काही सर्वोत्कृष्ट साधनांचे स्पष्टीकरण देतो, ज्यात क्रियाकलाप लॉग, टू-डू लिस्ट आणि कृती कार्यक्रम यांचा समावेश असतो. आपल्याला काय करण्याची गरज आहे, हे कदाचित



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला माहीत असते, पण ते कधी करावे ह्याचा अनेकदा आपल्याला विसर पडतो. आपण ठरविलेल्या अनेक गोष्टी आपण करतो पण आपले टाइमिंग चुकते आणि खरे म्हणजे टाइमिंग म्हणजेच सर्वकाही असते. आपण आपली कार्यक्षमता वाढवू शकतो, लोकांचा विश्वास मिळवू शकतो आणि आपल्या फायद्यासाठी वेळेच्या व्यवस्थापनासाठी अनेक पद्धती देखील वापरू शकतो. सर्वात यशस्वी "टाइम मॅनेजर्स" कडे लक्ष ठेवण्यासाठी स्पष्ट लक्ष्य असतात. ते नेहमीच स्मार्ट गोल विकसित करत असतात, ज्यामुळे त्यांना त्यांचा वेळ प्रभावीपणे वापरता येतो. आपल्या वेळेच्या व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यासाठी स्पष्ट उद्दिष्यांचा वापर कसा करायचा, आपल्या स्वतःला प्रेरित आणि शिस्तबद्ध राहण्यास मदत करण्यासाठी अनेक संसाधने देखील उपयोगात आणता येऊ शकतात. सामान्य वेळ-व्यवस्थापन आव्हानांवर मात करण्याच्या दृष्टीने नेहमीच उपयुक्त ठरत असते. जेणेकरून आपण आपला दृष्टिकोन सुधारत राहतो आणि आपला वेळ पूर्णपणे वापरतो. व्यवस्थापनात चांगला वेळ असण्यामध्ये जाणीवपूर्वक नियोजन आणि विचारपूर्वक निर्णय घेणे महत्वाचे असते. यामध्ये आपल्या कामाकडे, ध्येयाकडे लक्ष केंद्रित करणे आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतीत विचलित होण्याऐवजी आपल्या प्राधान्यकृत कार्यांवर चिकटून राहणे देखील आवश्यक असते. प्रभावी वेळ व्यवस्थापन नेत्यांना, उद्योजकांना आणि लहान व्यवसाय करणाऱ्यांना, मालकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत करते.



आधुनिक केसरी

## पंढरीची आता | ओढ लागे ||

गोंदला मी टीळा | भाळी चंदनाचा ||
ध्यास विठ्ठलाचा | मना लागे ||१||

शुभ्र ललाटीची | माया लुप्त झाली ||
काया गंधाळली | हरिनामे ||२||

माळ तुळशीची | रूळता गळ्यात ||
चैतन्य रोमात | डोलू लागे ||३||

अंतरीची साद | चेतली कृपेने ||
पूर्व संचिताने | धन्य झालो ||४||

टाळ-मृदुंगाचा | गजर ऐकता ||
पंढरीची आता | ओढ लागे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी

### अंबानाम-महात्म्य


झालो आज ओला चिंबा।
पेईले मी भक्तीथेंबा।
नको होणे कोरडा।
पुरे भवाचा गराडा।
अंबाबाई अंबाबाई।
नाम मुखी सदा घेई।
काव काव भवाची। चंद्रहासे भय नाही।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## काव्य-चरितावली

### प्रथम पुष्प हे



आधुनिक केसरी

श्रीसद्गुरूंना नमस्कार केला ।
श्रीकृपेने आरंभ केला ।
काव्यचरितावली सेवाउपक्रम ।
श्रीसद्गुरूचरणी रुजू केला ।।१ ।।

जाणोनी घ्यावे तुम्ही आता जन हो ।
श्री महाराजांच्या पूर्वचरिता ।
पूर्वज थोर सत्पुरुष असती।
संस्कार सावलीत सारे घडती ।। २ ।।

वावरहिवरे जवळ गोंदवले ।
मूळ पुरुष रुद्रोपंत हो इथले ।
विठ्ठल भक्तीभाव सदा अंतरी ।
नियमित करी पंढरीची वारी ।। ३ ।।

श्रीमहाराजांचे आजोबा लिंगोपंत ।
कुलकर्णीपदाची प्रतिष्ठा वाढविली ।
कर्तव्यपरायण "लिंगोपंत इनामदार ।
कीर्ती आसमंतात हो पसरली ।। ४ ।।

राधाबाई आज्जी, लिंगोपंत आजोबा
आदर्श वडीलधारे हेलाभले ।
सहवासात श्रीमहाराज घडले ।
आनंदात बालपण गेले ।।५ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

# मनाचे श्लोक

**कृपा भाकितां जाहला वज्रपाणी।**
**तयाकारणे वामनू चक्रपाणी।**
**द्विजाकारणे भार्गवू चापपाणी।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।१२२।।**

सरळ अर्थः वज्रधारी इंद्राने करुणा भाकताच चक्रपाणि विष्णूने वामनावतार घेतला तसेच तत्कालीन ब्राम्हणांवर चालवलेले अत्याचार थांबवण्यासाठी परशुरामाचा अवतार घेतला. कारण देव अडचणीत असलेल्या भक्ताकडे कधीहि पाठ फिरवत नाही.

**भावार्थ :** सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन करण्यासाठी भगवंत अवतार घेतात हे आपल्या सर्वांना माहीत आहे. वरील दोन्ही अवतार त्याचाच एक भाग आहे. भगवंत नीच योनीतील जीवांचेच रक्षण करीत नाही तर इंद्रासारख्या देवराजाचे आणि ब्राह्मण कुळातील लोकांचेही रक्षण करतो.

प्रल्हादाचा नातू बळी जेव्हा असुरांचा राजा बनला होता तेव्हाची गोष्ट आहे ही. बळी हा विष्णूभक्त होता आणि आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय होता. कनवाळू, कर्तव्यदक्ष आणि दानशूर अशा बळीला असुरांचे गुरु शुक्राचार्य यांनी एकदा सल्ला दिला की त्याने शंभर अश्वमेध यज्ञ करावेत म्हणजे त्याला इंद्रपद प्राप्त होऊन तो स्वर्गाचाहि स्वामी बनू शकेल. स्वर्गाच्या स्वामित्वाचा मोह कोणाला टाळता येईल? गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून बळीने अश्वमेध करायला सुरुवात केली. जसजशी यज्ञांची संख्या शंभराच्या जवळ येत चालली तसतशी देवाधिपती वज्रधारी इंद्राच्या मनात धडकी भरायला लागली. आपले इंद्रपद जाणार या भीतीने त्याने मग क्षीरसागरात शेषशय्येवर विश्रांती घेत असलेल्या विष्णूची प्रार्थना,



आपल्यावर कृपा करावी म्हणून त्याची भाकणूक करायला सुरुवात केली. बळीराजा तर मोठा सद्गुणी राजा होता. त्याने कधीहि कोणावरहि अन्याय केला नव्हता. कोणा याचकाला बळीच्या दरबारातून निराश, विन्मुख होऊन जावे लागले नव्हते. त्यामुळे भगवान विष्णू धर्मसंकटात पडले. काय करावे ? मग त्यांनी विचार केला आणि इंद्राला त्याचे इंद्रपद जाणार नाही अशी व्यवस्था आपण वेळ येताच करू असे आश्वासन देऊन स्वर्गलोकात परत पाठवले. कश्यप ऋषींची पत्नी, इंद्राची माता अदिति देखील पुत्राच्या चिंतेने व्याकुळ झाली होती तेव्हा कश्यप ऋषींनी तिला आश्वासन दिले की श्रीविष्णू तिच्या पोटी अवतार घेणार आहेत आणि ते इंद्राची काळजी दूर करतील. बळीराजाच्या शंभराव्या अश्वमेधाला सुरुवात झाली तेव्हा अदितीच्या पोटी एक दिव्य बालक जन्माला आले. अत्यंत तेजस्वी अशा त्या बालकाने जन्म घेताच बटूचे रूप धारण केले. कश्यप ऋषींनी त्याचे नाव वामन असे ठेवले आणि त्याची मुंज करून "ॐ भवति भिक्षांदेही" हा मंत्र देऊन बळीराजाकडे पाठवले. यज्ञस्थानी बटु वामन येताच बळीराजाने त्याचे स्वागत, आदरातिथ्य केले आणि विचारले, 'हे वामना, मी तुला काय भिक्षा देऊ?" तेव्हा वामन उत्तरला, "राजन्, माझ्या तीन पावलांनी व्यापली जाईल एवढी जागा तुम्ही मला द्यावी." बळीराजाने होकार देताच वामनाने विशाल अवतार धारण केला, त्याच्या एका पावलात स्वर्गलोक व्यापला गेला, दुसऱ्या पावलात पृथ्वी आणि मग वामनाने विचारले, "आता मी तिसरे पाउल कुठे ठेऊ?" तेव्हा वामन हा दुसरातिसरा कोणी नाही तर स्वतः भगवान विष्णू आहेत हे ओळखून नतमस्तक होऊन म्हणाला, "भगवन्, आपले पाऊल माझ्या मस्तकावर ठेवावे." शुक्राचार्यांनी परोपरीने राजाला हे दान न देण्याबद्दल सांगितले, इतके की दानानंतर हातावर पाणी सोडायच्या झारीत जाऊन त्यांनी पाणी अडवले पण राजाने त्यांना न जुमानता वामनाला आपल्या मस्तकावर पाउल ठेवायला विनवले. वामनावतारातले भगवान विष्णू प्रसन्न होऊन म्हणाले, " राजा, मी प्रसन्न आहे. तू माझा भक्त आहेस तेव्हा तुझीदेखील उपेक्षा मी करणार नाही. तू दिलेल्या या दानाचे फळ म्हणून मी तुला अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल आणि पाताल या पृथ्वीच्या पोटातील सप्तपाताळांपैकी तिसऱ्या सुतल या पाताळाचे राज्य देतो. स्वर्गापेक्षाहि अधिक संपन्न असे तुझे राज्य असेल. तू तिथला स्वामी बनून रहा. तुझा गदाधारी द्वारपाल म्हणून तिथे माझी उपस्थिती राहील." आणि अशा तऱ्हेने त्यांनी तिसरे पाउल बळीच्या मस्तकावर ठेऊन त्याला सुतल पाताळात पाठवले. इंद्रदेवाचीही उपेक्षा केला नाही आणि बळीराजाचीही नाही. कारण देव भक्ताभिमानी असतो. तो कोणाही भक्ताला उपेक्षित ठेवत नाही.

या श्लोकातील दुसरे उदाहरण आहे परशुरामाचे. परशुरामाचे पिता होते ऋषि जमदग्नी आणि माता रेणुका. ब्राम्हण पिता आणि क्षत्रिय कुलात जन्मलेली माता यांचे हे अपत्य. मूळचे नाव रामभद्र. पण शस्त्रास्त्रविद्येच्या अध्ययनात श्री गणेशाने त्यांना परशु (चाप) भेट म्हणून दिला त्यामुळे त्यांचे नाव परशुराम (चापपाणि) झाले. भृगु ऋषीचा प्रपौत्र (पणतू) म्हणून त्याना भार्गव असेही म्हणतात. श्रीविष्णूचा सहावा अवतार म्हणून ते जन्माला आले. परशुराम सात चिरंजीव व्यक्तींमधील एक आहेत म्हणून ते त्यांच्यानंतर झालेल्या प्रभु रामचंद्राच्या अवतारात आणि नंतरच्या श्रीकृष्ण अवतारातहि उपस्थित होते. परशुराम हा अवतार तेव्हाच्या क्षत्रिय राजांनी ब्रह्मवृंदावर केलेल्या अनन्वित अत्याचारांमुळे त्यांना शासन करण्यासाठी घेण्यात आला. महिष्मती नगरीचा क्षत्रिय राजा कार्तवीर्य ऊर्फ सहस्त्रार्जुन याने जमदग्नीच्या आश्रमातून कामधेनु कपिला गाय जबरदस्तीने हिरावून नेली आणि आश्रमाची नासधूस केली. त्यामुळे रागावून परशुरामाने कार्तवीर्याशी युध्द केले आणि त्यात त्याचे हजार हात छाटून त्याचा शिरच्छेद केला. यामुळे चिडलेल्या कार्तवीर्याच्या पुत्रांनी परशुराम आश्रमात नसताना त्याच्या पित्याचा – जमदग्नीचा वध केला. परशुरामाला हे समजल्यावर त्याने कोपायमान होऊन महिष्मतीवर जोरदार २१ हल्ले चढवून कार्तवीर्याच्या पुत्रांसह साऱ्या दुष्टबुध्दी क्षत्रियांना मारून पृथ्वी निःक्षत्रिय केली आणि ती कश्यपऋषींना भेट म्हणून दिली. स्वतः समुद्र हटवून त्याच्याकडून नवीन प्रदेश मिळवला व तिथे राहू लागले.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# वारसा हा फक्त रक्ताच्या नात्याचा नसतो !

## संजय राऊत यांना शिंदे गटाचे प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळाला भेट देण्यावरुन खासदार संजय राऊतांनी टोला लगावल्यानंतर आता शिंदे गटाने प्रत्युत्तर दिले आहे. आपल्या हातातले खंजीर बाजूला ठेवा आणि मग स्मारकाला हात जोडायला जा असा खोचक सल्ला संजय राऊत यांनी अप्रत्यक्षपणे एकनाथ शिंदे यांना दिला होता. त्यानंतर वारसा हा फक्त रक्ताच्या नात्याचा नसतो, तर विचारांचाही असतो. तोच विचार बाळासाहेबांची शिवसेना पुढे घेऊन जात असल्याचे शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के म्हणाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळाला भेट देणार असल्याच्या मुद्द्यावरून संजय राऊतांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना खोचक सल्ला दिला. बाळासाहेब ठाकरे हे या देशाचे आणि विश्वाचे आहेत. फक्त आपल्या हातातले खंजीर बाजूला ठेवा आणि मग स्मारकाला हात जोडायला जा. कुणीही असतील. मी कुणाचे व्यक्तीगत नाव घेत नाही, असे संजय राऊत म्हणाले. काय होतेय, काय होऊ घातलेय हे सगळे बाळासाहेब ठाकरे



पाहात आहेत. बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेच्या पाठित जे लोक खंजीर खुपसतात, त्यांचे कधी भले झालेले नाही हा इतिहास आहे. सगळेच बाळासाहेबांच्या समाधीवर जाऊ शकतात, पण चांगल्या मनाने जा, असेही संजय राऊत म्हणाले. संजय राऊतांनी आधी बाळासाहेबांचे हिंदुत्ववादी विचार बाजूला ठेवण्यासाठी प्रेरणा कुठून मिळाली हे सांगावे. मगच बाळासाहेबांच्या समाधीपुढे नतमस्तक व्हावे. आम्हाला बोलण्याचा तुम्हाला अधिकार नाही, असे प्रत्युत्तर बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी दिले आहे.बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी विचारांच्या पाठीत खंजीर कोणी खुपसले हे संजय राऊत यांनी सांगावे. सत्तेसाठी, खुर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली कोणी दिली? खुर्चीसाठी आपण बाळासाहेबांचे विचार बाजूला ठेवून काँग्रेस, राष्ट्रवादीशी आघाडी केली. बाळासाहेबांनी आयुष्यभर काँग्रेसला बाजूला ठेवण्यासाठी कष्ट घेतले, आणि आदित्य ठाकरे राहुल गांधींसोबत यात्रा करत आहेत. ज्या छगन भुजबळांनी बाळासाहेबांना सर्वात जास्त त्रास दिला, पोलीस कोठडीत टाकण्याचा प्रयत्न केला त्यांच्यासोबत 'मातोश्री'वर मांडीला मांडी लावून जेवत होतात. दाऊदशी संबंध असलेल्या नवाब मलिकांशी आपण युती केली. शेवटपर्यंत आपल्या मंत्रिमंडळात ठेवले," अशी टीका नरेश म्हस्के यांनी केली आहे. बाळासाहेबांचे विचार खऱ्या अर्थाने पुढे नेण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच करत आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल वाटेल ते बोलण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही. आम्ही बाळासाहेबांचे विचार संपूर्ण महाराष्ट्र, देशात नेत आहोत. त्यामुळे खरा अधिकार फक्त बाळासाहेबांची शिवसेना पक्षातील शिलेदारांचा आहे. वसा, वारसा हा फक्त घराण्याचा नसतो, तर तो विचारांचा, तत्वाचादेखील असतो," असेही ते म्हणाले आहेत.

# शनिवारवाडा परिसरातील दर्गा हटविण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेले अफजल खानाच्या कबर परिसरातील अतिक्रमण काढल्यानंतर आता पुण्यातील शनिवारवाडा परिसरातील मस्तानी दरवाज्यासमोरील हजरत ख्वाजा सैय्यद शाह पीर मकबूल हुसेनी दर्गा हटविण्यात यावा अशी मागणी हिंदू महासंघाचे आनंद दवे यांनी केली आहे. यावेळी आनंद दवे म्हणाले की, शनिवारवाडा बांधण्यात आला त्यावेळी या ठिकाणी कोणत्याही प्रकाराचा दर्गा किंवा पीर नव्हता. मात्र आपल्या देशातून इंग्रज जाताना त्यांनी अनेक गोष्टींची मोडतोड केली. त्याचाच एक भाग म्हणून इंग्रजांनी शनिवारवाडा परिसरातील मस्तानी दरवाजा समोरील हजरत ख्वाजा सैय्यद शाह पीर मकबूल हुसेनी दर्गा बांधला. आम्ही पुणे महापालिका व पुरातत्त्व विभागाकडे या दर्ग्याबाबत माहिती घेतली असता कोणत्याही प्रकाराच्या नोंदी नसल्याचे समोर आले आहे. त्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाबाबत १५ दिवसांत माहिती मिळावी, अशी मागणी पुणे महापालिका व पुरातत्त्व विभागाकडे आम्ही केली आहे. त्यानंतर आम्ही आमची पुढील भूमिका मांडणार आहोत. मात्र शनिवारवाडा परिसरातील हजरत ख्वाजा सैय्यद शाह पीर मकबूल हुसेनी दर्गा हटविला गेला पाहिजे अशी आमची मागणी असल्याचे आनंद दवे यांनी सांगितले.


# स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला

## शशिकांत कुलथे बीडमध्ये गुंफणार चौथे पुष्प



आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे चौथे पुष्प राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार हे राहणार असून आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजू मचाले, विनायक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार यावर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, विनायक कनिष्ठ महाविद्यालय, पेठ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने 'अध्ययन-अध्यापनातील प्रभावी संसाधने' या विषयावर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांचे व्याख्यान 18 नोव्हेंबर रोजी सकाळी 10 वाजता विनायक कनिष्ठ महाविद्यालयात होणार आहे. या व्याख्यानास उपस्थितीचे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी ॲड. संदीप बेदरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.



# लासूर स्टेशनच्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा माहिती देण्यास स्पष्ट लेखी नकार

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेने सन 2022-2023 ला विविध महामंडळ शेतीचे पीककर्ज व कृषी कर्जाची माहिती मनसेचे नेते आण्णासाहेब पाटील जाधव यानी लेखी स्वरूपात मागीतली होती तसे पत्र जाधव यानी 28 सप्टेंबरला बँकेच्या व्यवस्थापकांनां दिलेले होते मात्र बँकेच्या वरिष्ठ कार्यालयाने कुठल्याही प्रकारची माहिती देऊ नये असा मेल असल्याची बतावणी करून माहिती देण्यास स्पस्ट लेखी नकार बॅक प्रशासनाने जाधव यांना दिला आहे.

एस. एस. जाधव (बँक व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, लासूर स्टेशन)बँक ग्राहकाने किंवा कोणीही सामान्य माणसाने बँकेला माहिती विचारण्याचा परिपूर्ण अधिकार आहे मात्र कुठलीही माहिती देताना बँकेच्या वरिष्ठ कार्यलयाला कळवावे लागते त्यानुसार जाधव यानी लिखित स्वरूपात जीं माहिती मागितली होती त्याची माहिती आम्ही बँकेच्या वरिष्ठ कार्यलयाला दिली होती त्यानुसार वरिष्ठ कार्यलयाने आम्हाला मेल करून कळवले होते कीं सदरची माहिती बँकेच्या ध्येयधोरणानुसार देता येत नाही त्यामुळे आम्ही लेखी स्वरूपात जाधव यांना पत्र दिलेले आहे.



लासूर स्टेशन येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेला विविध महामंडळाचे कर्ज, पिककर्ज व विविध शेतीकर्ज वाटप याची माहिती मी लेखी स्वरूपात बँकेला विचारली होती . मात्र मी विचारलेली माहिती बँकेच्या ध्येयधोरनानुसार नसल्याचे कारण पुढे करून मला माहिती दिलेली नाही . करिता या कर्जवाटपात अनियमितता आहे कीं काय अशी शंका माहिती देत नसल्याने येत असल्याचे मनसेचे अण्णासाहेब पाटील जाधव यांनी सांगितले .



# शेतकऱ्यांना अतिवृष्टी मदतीसाठी फडणवीस यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** या वर्षी पावसाने कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांना चांगलेच रडावले या मुळे शेतकरी यांच्या हातातले पिक गेल्याने शेतकरी चांगलाच अडचणीत सापडला आहे शासनाची ही कुठलीच मदत आता पर्यत मिळाली नसल्याने शेतक -यांन मध्ये तिव्र नाराजी दिसुन येत असल्याने शेतकऱ्याला लवकरात लवकर मदत व्हावी यासाठी भाजपा औरंगाबाद उपजिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस व केन्द्रिय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांना कन्नड तालुक्यातील अतिवृष्टी बाधित शेतकरी बांधवाना मदत मिळावी याबाबत निवेदन देऊन आपले गाराने मांडले. याप्रंसगी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लवकरात लवकर शेतकरी बांधवाना दिलासा देण्यात येईल असे आश्ववसन देखील दिले.

# काँग्रेस नेते संजय निरुपम यांना पोलिसांनी केली अटक

## खा. गजानन कीर्तिकर यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बाईक रॅली काढणे पडले महागात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघाचे खासदार गजानन कीर्तिकर यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बाईक रॅली काढणे काँग्रेस नेते आणि माजी खासदार संजय निरुपम यांना महागात पडले आहे. संजय निरुपम यांना पोलिसांनी अटक केली आहे. निरुपम यांना वर्सोवा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. खासदार गजानन कीर्तिकर यांनी नुकतेच बाळासाहेबांची शिवसेना अर्थात शिंदे गटामध्ये प्रवेश केला. त्यांनी केलेला पक्षप्रवेश उत्तर पश्चिम मुंबईतील मतदारांचा अपमान असल्याचे सांगत त्यांनी त्वरित खासदारकीचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी माजी खासदार व काँग्रेस नेते संजय निरुपम यांच्या नेतृत्वाखाली बाईक रॅली काढण्यात येणार होती. उत्तर पश्चिम जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे आज (बुधवार 16 नोव्हेंबर रोजी) दुपारी 2 वाजता बाईक रॅली काढण्यात येणार होती. पण त्यापूर्वीच पोलिसांनी संजय निरुपम अटक करून, त्यांना वर्सोवा पोलिस ठाण्यात नेले व बाईक रॅली




काढण्यास अटकाव करण्यात आला. 'शिवसेना-भाजप युतीचे उमेदवार म्हणून तुम्ही निवडणूक लढवली आणि जिंकली. साहजिकच आता तुम्ही पक्ष सोडला आहात तर खासदारकीचा राजीनामा द्यायला हवा. ही गद्दारी आहे. ज्या पक्षाने तुम्हाला सगळे काही दिले, ज्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, मतदारांनी तुम्हाला जास्तीत जास्त मत देऊन निवडून आणले, त्यांचा हा विश्वासघात आहे. तुम्हाला जास्त मते मिळाली म्हणून तुम्ही निवडून आलात आणि कमी मिळाली त्यामुळे मी पराभूत झालो. त्यामुळे आता पक्ष बदलल्यानंतर तुम्हाला राजीनामा द्यावा लागेल' अशी मागणी निरुपम यांनी केली. दरम्यान, नुकतेच ठाकरे गटातून शिंदे गटात आलेल्या गजानन कीर्तिकर यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बुलढाण्याचे खासदार प्रतापराव जाधव आणि गजानन कीर्तिकर यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिपद मिळण्याच्या हेतूनेच गजानन कीर्तिकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याचेही बोलले जात आहे.

# रोनाल्डोचा खुलासा

आधुनिक केसरी

मँचेस्टर युनायटेड क्लबमधील स्टार फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोबद्दल बऱ्याच दिवसांपासून वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या येत आहेत. आता रोनाल्डोनेच एका मुलाखतीच्या माध्यमातून क्लबच्या काही सदस्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्याला काढून टाकण्याचे 'षडयंत्र' रचले जात आहे.' असा आरोपही करण्यात आला असून, त्यानंतर फुटबॉल विश्वात खळबळ उडाली आहे. आज आम्ही तुम्हाला मुलाखतीत दिलेल्या काही मोठ्या विधानांबद्दल सांगत आहोत, ज्यांची आज सर्वत्र चर्चा होत आहे. रोनाल्डोने टीव्ही व्यक्तिमत्व पियर्स मॉर्गनला दिलेल्या मुलाखतीत अनेक मोठे खुलासे केले आहेत. क्लबचे सध्याचे व्यवस्थापक एरिक टॅन हागसह अनेक उच्च व्यवस्थापन अधिकाऱ्यांवरही आरोप केले आहेत. रोनाल्डोने लावलेला सर्वात मोठा आरोप म्हणजे मॅनेजर हैग आणि २-३ लोक त्याला क्लबमधून बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. रोनाल्डो म्हणाला, "मला फसवल्यासारखे वाटले. व्यवस्थापक एरिक टॅन हाग आणि २-३ वरिष्ठ कार्यकारी स्तरावरील लोक मला क्लबमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. असे काही लोक आहेत ज्यांना मी या वर्षीच नाही तर गेल्या वर्षीही क्लबमध्ये नको होतो." रोनाल्डोने मुलाखतीत कबूल केले आहे की, तो सध्याचा व्यवस्थापक एरिक टॅन हागचा आदर करत नाही. रोनाल्डोच्या मते, हेग त्याचा आदर करत नाही आणि त्यामुळे तो हैगचा आदर करू शकत नाही. या दोघांमध्ये सुरुवातीपासूनच समस्या असल्याच्या बातम्या येत होत्या. हैगने एकतर मोसमातील बहुतेक सामन्यांमध्ये रोनाल्डोला सामन्याबाहेर ठेवले किंवा सुरुवातीच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये त्याचा समावेश केला नाही, यामुळे रोनाल्डो खूपच निराश दिसत आला आहे. रोनाल्डोच्या जोडीदाराने या वर्षी एप्रिलमध्ये जुळ्या मुलांना जन्म दिला, त्यापैकी त्यांची मुलगी बेला ही निरोगी जन्मली होती, परंतु नवजात मुलाचा मृत्यू झाला होता. अशा परिस्थितीत कुटुंबासोबत वेळ घालवल्यानंतर तो पुन्हा क्लबसाठी खेळायला आला. या वर्षी जुलैमध्ये, रोनाल्डो क्लबच्या प्री-सीझन प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी आला नाही. रोनाल्डोने मुलाखतीत सांगितले की, जुलैमध्ये या काळात त्याची लहान मुलगीच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे प्रशिक्षणात सहभागी होऊ शकली नाही. पण रोनाल्डोच्या म्हणण्यानुसार, युनायटेडच्या अध्यक्षांपासून ते इतर सदस्यांनी ते एक निमित्त मानले आणि तो खोटे बोलत आहे असे त्यांना वाटू लागले. रोनाल्डोच्या मते, क्लबचे मालक असलेल्या ग्लेझर कुटुंबाला क्लबची चिंता नाही. फक्त मार्केटिंगसाठी क्लब वापर करतात. रोनाल्डोने गेल्या अनेक महिन्यांपासून क्लबच्या चाहत्यांच्या वतीने 'ग्लेजर्सआउट' नावाच्या मोहिमेला पाठिंबा दिला आहे. चाहत्यांचे म्हणणे अगदी बरोबर असल्याचे रोनाल्डोने मुलाखतीत सांगितले.

# लिव्ह इन रिलेशनचे बळी


अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

काही वर्षांपूर्वी टीना डाबी नावाच्या एका आयएएस अधिकारी असलेल्या व त्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या मुलीने त्याच परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या परधर्मीय अथर आमिर खान या मुलाशी विवाह करण्याचा निर्णय घेतला. अगदी दोन वर्षातच तिला त्यापासून घटस्फोट घेऊन पळावे लागले. ही परिस्थिती जर इतक्या उच्च पदावर काम करणाऱ्या महिलेची असेल तर सर्वसामान्य कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या श्रद्धाचे काय? त्यामुळे मुलींनी परधर्मीय विवाह किंवा लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहताना विचार करणे जास्त गरजेचे आहे. विवाहाची व्यवस्था असताना लिव इन रिलेशनशिपचा पर्याय मुलींनी का म्हणून स्वीकारला पाहिजे याचा विचार होणे गरजेचे आहे. पालकांनी सुद्धा आपली मुलगी काय करते आहे, कुणासोबत फिरते आहे, तिचे मित्र कोण आहेत, कुठे ती अधिक वेळ घालविते याची माहिती ठेवणे गरजेचे आहे.

नुकताच श्रद्धा नावाच्या तरुणीचा तिचा लिव्ह इन पार्टनर आफताब याने केलेला निर्घृण खून चर्चेचा विषय झालेला आहे. श्रद्धा ही महाराष्ट्रातील पालघर येथे राहणारी मुलगी होती. ती एका कॉल सेंटरमध्ये मुंबईला नोकरी करत होती. तेथेच काम करणाऱ्या आफताबशी तिची ओळख झाली. पुढे ती प्रेमात पडली व आफताब सोबत घरच्यांच्या विरोधाला न जुमानता लीफ इन रिलेशनशिप मध्ये राहण्यासाठी दिल्ली येथे निघून गेली. काही वर्ष सोबत राहिल्यानंतर भारतीय मुलींच्या मानसिकतेप्रमाणे तिने आफताब ला लग्न करण्याचा तगादा लावला. अर्थातच आफताब ने त्याला नकार दिला. आपल्या मागची ही पीडा दूर करण्यासाठी आफताबने तिचा खून केला व तिच्या देहाचे 35 लहान लहान तुकडे करून एका फ्रीजमध्ये भरून ठेवले. त्यातील एकेक तुकडा तो रात्री निघून दिल्ली येथील मेहरोलीच्या जंगलात नेऊन फेकायचा. अशा प्रकारे त्याने प्रेताची विल्हेवाट लावली. श्रद्धा जिवंत आहे हे दाखविण्यासाठी तो तिचे इंस्टाग्राम अकाउंट सुद्धा स्वतःच हँडल करायचा. त्यामुळे इंस्टाग्राम वर तिच्या विविध पोस्ट पाहून तिच्या घरच्यांना ती जिवंत आहे असेच वाटत होते. पण अनेक महिन्यांपासून तिच्याशी कुठलाही संपर्क न झाल्यामुळे तिच्या वडिलांनी पोलिसात तक्रार केली व शेवटी सहा महिन्यांनी पोलिसांनी आरोपीला बेडया ठोकल्या व त्यानंतर संपूर्ण देशाला श्रद्धाचा खून कशा प्रकारे झाला हे माहित झाले. ही घटना सुन्न करणारी आहे. ज्या ज्या वेळेस अशा पद्धतीच्या घटना घडतात त्यावेळेस लव जिहाद आणि लिव इन रिलेशन सारखे विषय पुन्हा चर्चेला येतात. यानिमित्ताने काही गोष्टी लक्षात घेतल्या गेल्या पाहिजे. वास्तविक पाहता मुलींनी परधर्मीय व्यक्ती सोबत प्रेम करताना किंवा लग्न करण्याचा निर्णय घेताना किंवा लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहण्याचा निर्णय घेताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे की तो व्यक्ती ज्या धर्माचा आहे त्या धर्मामध्ये महिलांचे स्थान काय आहे. त्या धर्मामध्ये विवाहाचे महत्त्व किती आहे? त्या धर्मामध्ये लिव्ह इन रिलेशनशिपला काय मान्यता आहे. श्रद्धा ने घरच्यांचा विरोध पत्करला व ती आफताब सोबत लिव इन रिलेशन मध्ये राहायला तयार झाली. लिव्ह इन रिलेशनच का? त्याच वेळेला तिने लग्नाचा हट्ट का केला नाही हा सुद्धा प्रश्न आहे. ज्या गोष्टीसाठी तो श्रद्धा सोबत लिव इन मध्ये राहायला तयार झाला होता कदाचित त्याच गोष्टीसाठी त्याने तिच्यासोबत लग्न सुद्धा केले असते. कारण अनेक वेळा लिव्ह इन ही गरज भागविण्यासाठी केलेली तडजोड असू शकते. चार वर्षानंतर श्रद्धा जुनी झालेली होती त्यामुळे तिच्यासोबत निकाह करण्याचा आफताबच्या लेखी प्रश्नच नव्हता. तिची मागणी हा केवळ मूर्खपणा होता. त्याचे तिच्यावर खरे प्रेम नव्हते आणि असते तर तो तिचा खून करण्या इतका खालच्या स्तराला गेला नसता. केवळ खूनच नव्हे तर तिचे तुकडे तुकडे करून ते सुद्धा सांभाळून ठेवण्याचे क्रौर्य त्याने दाखविले नसते. आफताब सोशल मीडियावर स्वतःला सुधारणावादी, पर्यावरण कार्यकर्ता व अशाच अनेक प्रकारे रंगवीत होता. परंतु त्याचे खरे स्वरूप काय होते हे आता उघड झालेले आहे. अनेक वेळा महिला या वेगवेगळ्या कारणांच्याद्वारे लिव इन मध्ये राहायला तयार होतात. परंतु त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांना सांभाळण्याची जबाबदारी त्यांची स्वतःची होऊन जाते. हिंदू धर्मामध्ये विवाह हा 16 संस्कारांपैकी एक आहे. विवाह हा केवळ स्त्री आणि पुरुष यांच्या मधला संबंध नसून तो एक सामाजिक संबंध आहे.यामध्ये दोन्ही कडील लोक सामील असतात. विवाह जुळविताना बरेचदा जात, धर्म, वय,शिक्षण,आर्थिक परिस्थिती, भौगोलिक परिस्थिती, सामाजिक स्थान अशा अनेक गोष्टींचा विचार केला जातो. कोणी कुठेही भेटला ओळखी झाली आणि म्हणून लग्न केले असे होत नाही. हिंदू धर्मामध्ये जे विविध प्रकारचे ऋण सांगितले आहे ज्यामध्ये



पितृऋण, देवऋण आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी विवाह केला जातो. प्रजोत्पादन हे एक कर्तव्य म्हणून केले जाते. यामध्ये परिवार ही संकल्पना आहे. हिंदू धर्मामध्ये स्त्रीचे एक स्थान आहे. पत्नी म्हणून तिचे कुटुंबामध्ये सुद्धा एक स्थान आहे. तिला एक सामाजिक संरक्षण आहे .कायद्याच्या दृष्टिकोनातून सुद्धा तिला संरक्षण आहे. लिव इन मध्ये मात्र सर्व संघर्ष हा तिचा एकटीचा संघर्ष आहे. वास्तविक पाहता मुलींनी हा प्रश्न स्वतःलाच विचारण्याची आवश्यकता आहे की समोरचा जोडीदार हा विवाह न करता लिव्ह इन मध्ये राहण्याचा आग्रह का धरीत आहे. त्याला जबाबदारी का नको आहे?अनेक वेळा विवाहित पुरुष नोकरी निमित्त किंवा व्यवसायानिमित्त इतर शहरांमध्ये जाऊन अशा अविवाहित तरुणी सोबत लिव इन मध्ये राहत असतात. त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी बरेचदा मुलींना माहीत नसते. नातलग व समाजाचे लोक सुद्धा तिने स्वतः घेतलेला निर्णय असल्यामुळे तिच्या मागे नसतात. एखादा नवरा आपल्या बायकोला मारत असेल तर आजूबाजूचे लोक सुरुवातीला त्यांच्याकडे बघतात. नंतर त्या पुरुषाला समजवण्याचा प्रयत्न करतात. त्या स्त्रीला सुद्धा विविध प्रकारचे सल्ले देतात.महिला सेलमध्ये पाठवितात. समुपदेशका कडे सुद्धा पाठवतात. दोन्ही बाजूंच्या लोकांची बैठक घेतली जाते. कौटुंबिक हिंसाचारापासून कायद्याद्वारे सुद्धा तिला संरक्षण असते. राहायला तिला हक्काचे घर असते. मनात आलं म्हणून तू उद्यापासून इथे राहू नको असे नवरा म्हणू शकत नाही. असे अनेक प्रकारचे बंधन पुरुषांवर व अनेक प्रकारचे संरक्षण स्त्रीला विवाहाद्वारे प्राप्त होते. परंतु हे सर्व संरक्षण सोडून ज्या वेळेला एखादी महिला एखाद्या पुरुषासोबत लिव इन मध्ये राहिला तयार होते त्यावेळेला तिने अनेक वेळा विचार करण्याची आवश्यकता असते. विशेषतः ज्या वेळेला तुम्ही परधर्मातील व्यक्तीसोबत राहायला तयार होता त्यावेळेला ती तर एक मोठी धोक्याची घंटाच म्हटली पाहिजे. कारण त्याने तुम्हाला सोडल्यावर नातलग तुम्हाला जवळ करत नाही. घरचेही तुम्हाला जवळ करत नाही. अशा परिस्थितीत त्याच्याकडे राहणे किंवा आत्महत्या करणे असेच पर्याय महिले समोर राहतात. हे सगळेच अत्यंत कष्टदायक, दुःखदायक आहे. विवाह नावाची संस्था आपल्या पूर्वजांनी अतिशय विचार पूर्वक बनविलेली आहे. त्यात पतीचे कर्तव्य काय आहे पत्नीचे कर्तव्य काय आहे हे सांगितलेले आहे. विवाह ही मौजमजेशी गोष्ट नसून त्यामध्ये कर्तव्य व जबाबदारी या गोष्टी निहीत आहेत. काही वर्षांपूर्वी टीना डाबी नावाच्या एका आयएएस अधिकारी असलेल्या व त्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या मुलीने त्याच परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या परधर्मीय अथर आमिर खान या मुलाशी विवाह करण्याचा निर्णय घेतला. अगदी दोन वर्षातच तिला त्यापासून घटस्फोट घेऊन पळावे लागले. ही परिस्थिती जर इतक्या उच्च पदावर काम करणाऱ्या महिलेची असेल तर सर्वसामान्य कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या श्रद्धाचे काय? त्यामुळे मुलींनी परधर्मीय विवाह किंवा लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहताना विचार करणे जास्त गरजेचे आहे. विवाहाची व्यवस्था असताना लिव इन रिलेशनशिपचा पर्याय मुलींनी का म्हणून स्वीकारला पाहिजे याचा विचार होणे गरजेचे आहे. पालकांनी सुद्धा आपली मुलगी काय करते आहे, कुणासोबत फिरते आहे, तिचे मित्र कोण आहेत, कुठे ती अधिक वेळ घालविते याची माहिती ठेवणे गरजेचे आहे. विशेषतःमुलींच्या मैत्रिणींना त्यांच्याबद्दल बरीच माहिती असते.तर तिच्या मैत्रिणींना सुद्धा विश्वासात घेऊन अशा पद्धतीची माहिती मिळवीत राहणे हे सुद्धा गरजेचे आहे. आपली मुलगी अशी कोणत्या विधर्मी किंवा वयस्कर माणसाच्या प्रेमात पडली असेल तर खूप गोंधळून न जाता तिच्या विरुद्ध एकदम मोर्चा न उघडता हळूहळू रोज एक एक गोष्ट तिला समजावून कशी सांगितली जाईल, आपण जर समजावून सांगू शकत नसेल तर सामाजिक कार्यकर्ते, तज्ञ, मार्गदर्शक, समुपदेशक, डॉक्टर यांची मदत कशी घेतली गेली पाहिजे हे बघितले पाहिजे .अशाप्रकारे अंध झालेल्या मुलाला किंवा मुलीला समजावून सांगणे ही एक दिवसीय क्रिकेटची मॅच नव्हे हे समजून घेतले पाहिजे. या प्रक्रियेला वेळ लागू शकतो. ही संयमाची परीक्षाच आहे हे सुद्धा पालकांनी लक्षात घेतले पाहिजे. वयात आलेल्या मुलींना विवाह आणि लिव इन रिलेशनशिप हे काय पर्याय आहेत, यांच्यात काय फरक आहे, मुलीच्या दृष्टिकोनातून विवाह हा सर्वोत्तम पर्याय कसा आहे हे हळूहळू सांगितले गेले पाहिजे.

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब !


श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसाला पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची दहावी पुण्यतिथी. २३ जानेवारी १९२६ रोजी जन्मलेल्या बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत.**

याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पालकांनो तिला जपा...!

आधुनिक केसरी

**प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं. तुमचं आमचं नेहमीच सेम असतं. अशा भाबड्या कल्पनेत आपण असतोच. पण लव्ह जिहादचा एक भाग असलेले प्रेम हे मात्र सेम नाही, तर तो एक मोठा धार्मिक गेम आहे. षडयंत्र आहे. इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठीच काही धर्मांध व्यक्ती, संस्था, संघटनांकडून योजलेले एक कारस्थान आहे. या फसव्या प्रेमाच्या जाळ्यात हिंदु मुली कशा अडकतात? त्यांचे धर्मांतर कसे केले जाते? एखादा मासा जाळ्यात अडकून तडपावा, त्याप्रमाणे या मुली धर्मांतरानंतर वा लग्नानंतर कशा तडफडत जगतात? यातून हजारो हिंदू कुटुंबे कशी पूर्णपणे उध्वस्त होत आहेत? या संकटापासून हिंदू मुलींना कसे वाचवता येईल? यासाठी तुम्ही आम्ही काय करु शकतो हे सगळे सांगण्यासाठीच हा संवाद आहे.**

## हिंदूंनों समजून घ्या

दुदैवाने धर्माबाबत आज समाजात, विचारवंतांमध्ये, सोशल मिडियात, विविध संस्था संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये इतकी चुकीची समीकरणे तयार झाली आहेत, की कोणी मुस्लीम वा ख्रिश्चनांना नाही तर त्यांच्या धर्मांध वागण्याला थोडा विरोध केला, तर तो विरोध करणारा, त्याबद्दल बोलणारा लगेच जातीयवादी, मुस्लीमविरोधी, ख्रिश्चनविरोधी ठरवला जातो. त्याचप्रमाणे हिंदूमधीलही अंधश्रद्धांना कोणी विरोध केला, की धर्माच्या तथाकथित ठेकेदारांकडून त्याला हिंदू समाजाचा शत्रू ठरवला जातो.थेट धर्मद्रोही ठरवला जातो. मूळ समस्येकडे न बघता समस्येंवरील भाष्यावरुन लगेच त्या व्यक्तीचे वर्गीकरण करायची आम्हाला घाई असते. आता या समस्येंकडे पाहण्यासाठी, त्या सोडवण्यासाठी तुम्हाला कोणत्या ना कोणत्या तरी गटात सामिल व्हावेच लागते असे नाही. डावे उजवेच व्हावे लागते, असेही नाही पण जे चुकीचे आहे त्याला चुकीचे म्हणण्याइतका किमान तटस्थपणा तरी आपल्याजवळ आहे का? अल्पसंख्य शद्भाभोवती उगाचच सहानुभूतीचे वलय तयार करायचे अन त्यांच्या धर्मांध कारवाया झाकून ठेवायच्या. हे किती दिवस चालणार? भारतीयांची राज्यघटना लोकसंख्येच्या बळावर किंवा मतांच्या धमकीवर आज वा उद्या विशिष्ट धर्मावर आधारित होवू नये, ती कायम धर्मनिरपेक्षच रहावी यासाठी आपण कायमच सावध राहिले पाहिजे. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन कुणीही असोत, बाबांनो तुमचे धर्मग्रंथ वंदनीय, पूजनीय आहेत. पण आज ते अनुकरणीय नाहीत. त्यांचे स्थान हृदयात नसून वाचनालयाच्या कपाटात आहे. व्यवहारात विज्ञान आणि मानवता हीच एक कसोटी आहे. भारतात हिंदूंना हिंदू म्हणून राहण्याचा पूणं अधिकार आहें.

## लव्ह जिहाद नक्की काय आहे?

साधारणपणे लव्ह जिहाद या संकल्पनेचा अर्थ लव्ह फॉर जिहाद किंवा जिहाद थ्रू मीन्स ऑफ लव्ह अर्थात फसव्या प्रेमातून धर्मांतराचा जिहाद असा आहे. खरे तर गैरमुस्लिमांना मुस्लीम धर्मात आणणे, या अनेक वर्षे चालू असलेल्या अनेक प्रकारच्या प्रयत्नांपैकी लव्ह जिहाद फक्त एक नवीन प्रकारचा प्रयत्न आहे. या संकल्पनतील प्रेमाचा अर्थ स्पष्ट करुन सांगायची गरज नाही, पण जिहाद या नवीन असलेल्या संकल्पनेचा अर्थ नीट समजून घेणे आवश्यक आहे. जिहाद हा शद्ब अरबी जुहद या शद्बापासून आला आहे. त्याचा अरेबिक शाद्बीक अर्थ प्रयत्न करणे, संघर्ष करणे हा आहे. इस्लामिक परिभाषेत त्याचा अर्थ अल्लाहच्या कार्यासाठी प्रयत्न करणे हा अहे. जिहाद हा व्यापक आणि सर्वसमोशक शद्ब असून त्यात गैरमुस्लिमांविरुद्ध लढणे, स्वतःच्या दोषांविरुद्ध संघर्ष करणे, वाणीने किंवा शस्त्राने संघर्ष करणे, भौतिक आणि आंतरिक संघर्ष करणे अशा गोष्टी येतात. इथे प्रयत्न आणि संघर्ष हे शद्ब फार महत्वाचे आहेत. ते मुस्लिमांसाठी एक युद्ध आहे. जगात कुठेही नजर फिरवली तरी तुमच्या लक्षात येईल की जिथे मुस्लिमांची ताकद अधिक आहे, त्यांचे संख्याबळ जास्त आहे, तिथे इस्लामिक राजवटीसाठी उघड उघड संघर्ष केला जातो. आक्रमक हिंसक मार्गाचा जिहाद केला जातो. त्याचे मार्ग पुढीलप्रमाणे. त्यांच्या तुलनेत कमी असलेल्या गैरमुस्लिमांना जबरदस्तीने मुस्लीम व्हायला भाग पाडणे. यसाठी त्यांना मृत्युचे भय दाखवले जाते. त्यांना इस्लामिक प्रदेशातून हाकलून दिले जाते, जसे की काश्मीर खोऱ्यातून 3 लाख हिंदूंचे उच्चाटन करण्यात आले. त्यांना शासन करणे. त्यांची घरे, जमिनी, संपत्ती, व्यवसाय, मालमत्ता काबिज करणे. दहशत पसरवण्यासाठी त्यांचे हत्याकांड घडवून आणणे, त्या भीतीच्या जोरावर त्यांचे धर्मांतर करुन घेणे. त्यांच्याकडून जिझिया कर वसूल करणे (इस्लामिक राज्यात गैरमुस्लिमांनी द्यावयाचा कर.) त्याचप्रमाणे गैरमुस्लिमांना दुय्यम नागरीक म्हणून वागवत अगदी प्राथमिक संधीही नाकारणे असेही अनेक मार्ग वापरले आहेत. (आजही पाकिस्तानात शिखांकडून ते केवळ गैरमुस्लिम आहेत म्हणून तालिबानी अतिरेकी जिझिया कर वसुल करतात)




## लव्ह जिहाद मधला धर्मांतराचा डाव

आज भारतात व भारतबाहेरही हिंदू, शिख, बौद्ध समजातल्या विद्यार्थीनीपासून ते विवाहित महिलांपर्यंत आणि महाविद्यलयांपासून ऑफिसपर्यंत सर्व ठिकाणी हा फसव्या प्रमातून धर्मांतराचा डाव खेळला जातो. संसाराची स्वप्ने दाखवून हिंदू मुलींना जाळ्यात ओढायचं. सर्व शपथा, वचन देवून त्यांना इस्लाम कबूल करायला लावायचा. त्यांचे धर्मांतरण करायचे. आणि त्यांच्याशी विवाह किंवा पुर्नीविवाह करायचा. एकदा का ती मुस्लीम झाली की, त्यानंतर तिला कोणत्याही प्रकारच्या दहशवादाच्या वा गुन्हेगारी कामात सामील करुन घ्यायचे. तसे नाही झाले तर तलाकची धमकी देवून तिच्या असाहयतेचा फायदा घेत दहशतीने कोणतीही कामे करुन घ्यायची. किंवा तिचे लैंगिक शोषण करुन तीन चार मुले पैदाह करुन घ्यायची. नंतर तिला वाऱ्यावर सोडून द्यायचे. नाहीतर दुय्यम बायको बनवून ठेवायचे. नाहीतरी मुलीला रितसर सोडचिठ्ठी देण्याच्या बदल्यात मुलींच्या आईवडलांकडून भक्कम पैसे उकळायचे.

अश्विनी टेंबे

## जेव्हा मुली पळून जातात...

कोणालाही कळू न देता आपली मुलगी अचानक पळून जाते, त्यानंतर घरात आणि नातवाईकांमध्ये मोठा गहजब होतो. तिच्यावर सगळेच संताप करायला लागतात. घराची अब्रू घालवली, आता समाजात काय तोंड दाखवणार? लोक काय म्हणतील? इत्यादी इत्यदी. ती आजपासून माझ्यासाठी मेली असे टोकाचे बोलायलाही पालक कमी करत नाहीत. हे बरोबर नाही.

## कशी असावी पालकांची भूमिका

मुलगी एका परधर्मीयाबरोबर पळून गेली... अशावेळी पालकांनो सबुरीने घ्या. लोक, समाज बोलतच राहणार. त्यांच्याही आधी तुम्ही तुमच्या मुलीचा विचार करा. समाज किंवा लोक अशा नाजूक प्रसंगी मुलगी परत आणण्यासाठी करण्याचे उपाय आणि त्यासाठीची कृती यामध्ये किती सहभाग घेतात. याचा अंदाज घ्या. अशा मंडळींना लांबच ठेवा.

पालकांनो.... एक लक्षात घ्या. मुलगी खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवली गेलेली असते. ती एका कटकारस्थानाला बळी पडलेली असते. त्यात आपल्या मुलीचा दोष असेलही पण तिला धर्मांतरासाठी फसवणाऱ्यांचा दोष जास्त आहे. हे सर्वप्रथम स्विकारा. माझी पोटची मुलगी मी इतक्या सहजासहजी जावू देणार नाही, असा पक्का निग्रह करा. मुलीच्या नावाने बोट मोडत बसू नका. ते सर्वात सोपे आहे. ते कोणीही करेल. मात्र आपल्याला झालेल्या घटनेला समर्थपणे सामोरे जाण्याचे अवघड काम करायचे आहे. लक्षात घ्या, मुस्लीम जिहादीबरोबर पळून जाण्याचा तिचा निर्णय हा एका दिवसात झालेला नसतो. तेव्हा तिच्यावर रागवताना पालक म्हणॅून आपण कुठे कमी पडलो याचाही विचार करा. देव, देश, धर्माचे त्याहून सर्वात म्हत्वाचे म्हणजे आपल्या इतिहासाचे आपण मुलीर काय सर्ंस्ंकार केले, तिच्याशी त्या विषयावर कधी सेंवाद साधला, याचाही विचार करा.

ती कोणाबराबेर पळून गेली असेल याचा दाट संशय असेल किंवा कोणबाबात संशय असेल तर त्या व्यक्तीविरुद्ध थेट उच्च न्यायालयात हेबइस कॉर्पस या अधिकारांतर्गत त्वरीत याचिका दाखल करा. त्या व्यक्तीला न्यायालयात हजर करण्याचा आदेश माननीय कोर्ट पोलसांना देते व त्यातून अनेक गोष्टींचा उलगडा होतो व पुढील कार्यवाहीस मदत होते. सर्वात म्हत्वाचे म्हणजे पहिले काही दिवस ती व तो लव्ह जिहादी लपून छपून इकडेतिकडे राहात असतात. कुठे कुठे प्रवास करतात. अशा वेळी मुलाची खरी लायकी व खरे रंग मुलींना कळायला लागतात. यादरम्यान पश्चातापाने जर ती पुन्हा घरच्या लोकांशी संपर्क साधायचा प्रयत्न करत असेल तर अशावेळी फोनवरच तिच्यावर राग काढला जातो. इथेच आपली चूक घडते. तिच्या मनात परत येण्याचा विचार सुरु असतो, पण घरचे आता आपल्याला स्विकारणार नाहीत या भितीपोटी ती घरी परतत नाही. त्यामुळे नाइलाजाने तीं त्याच्याबरोबरच फिरत राहते.

मुलगी पुन्हा घरी आल्यानंतर तिचे योग्य ते समुपदेशन केल्यानंतर ती तच्यिा आयुष्यात स्थिर झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे परत येत असलेल्या मुलीला दूर लोटू नका. यावरुन तुमच्यात किती पुरुषार्थ आहें ते कळेल. शांतपणे तिचे मन वळवण्यात, तिला प्रेमाने स्विकारण्यात खरा अर्थ आहे.

**(लेखिका विविध सामाजिक विषयांच्या अभ्यासक आहेत.)**

# कर्तृत्ववान स्त्रियांची अंधारलेली वाट

आधुनिक केसरी

**शिवसेनेच्या तडफदार प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्या पतीने त्यांच्यावर केलेल्या आरोपांमुळे कर्तुत्ववान स्त्रियांचे पाय ओढण्याची प्रवृत्ती ठळकपणे दिसते आहे. वैयक्तिक जीवनातील जबाबदाऱ्या आणि सामाजिक बंधनांमुळे स्त्री जीवनाची वाट नेहमीच खडतर राहिलेली आहे. 19 व्या शतकात सावित्रीबाई फुले यांनी टाकलेली स्त्री शिक्षणाची ठिणगी ज्योत बनेपर्यंत विसाव्या शतकातील 60 चे दशक उजाडले. 21 व्या शतकात शिक्षण नोकरी ,व्यवसाय या सर्व क्षेत्रांमध्ये भरपूर प्रगती केली. बदलत्या समाजमनामुळे कित्येक भाग्यवान महिलांना परिवारातील लोकांचा त्यांच्या वाटचालीत पाठिंबा मिळाला. कित्येकांच्या वाट्याला संघर्षही तितकाच आला. काहींनी त्या संघर्षमय वाटेवरून मार्गक्रमण करत यश मिळवले. तर काहींचा प्रवास दुर्दैवाने अर्ध्यावर संपुष्टात आला. तो संघर्ष आता संपलेला आहे, असे मात्र अजिबात नाही.**

खेड्यापाड्यातील गरीब, शोषित, मागास प्रवर्गातील महिला आजही जीवनातील मूलभूत हक्कांसाठी झटत करत आहेत. संविधानाने जरी स्त्रीवर्गाला पुरुषांप्रमाणे समान अधिकार दिले असले तरीही सामाजिक जीवनात स्त्रीला पुरुषांच्या तुलनेत फार कमी अधिकार आहेत. पुरुषांच्या आयुष्यात संघर्ष नसतो असे अजिबात नाही. मात्र त्या संघर्षात कुटुंबीय जोडीदार आणि समाज सहजरित्या त्याची साथ देतात. म्हणून ध्येय गाठण्यासाठी घरसंसार सोडावे लागणारी पुरुष मंडळी समाजात क्वचितच आढळतात . "यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते' हे त्यामुळेच म्हटले जाते. स्त्रियांच्या वाट्याला हा पाठिंबा वा साथ अभावानेच येतो. आपल्या वाटचालीत अडथळा येऊ नये म्हणून स्त्रियांना अविवाहित रहावे लागते . विवाहित स्त्रियांना पतीचा किंवा सासरच्या मंडळींच्या पाठिंब्या अभावी आपल्याचा संसार किंवा ध्येय यापैकी एकाची निवड करावी लागते. त्यांना तडजोड करून मन मारून जगावे लागते. घटस्फोट घेऊन ध्येय प्राप्तीचा मार्ग निवडला, तर समाजाकडून दूषणे मिळतात. घरातील मंडळीही त्याला अपवाद नसतात. घटस्फोटीत मुलीमुळे घराण्याची समाजामधील प्रतिष्ठा गेली, असे पालकांना वाटते. मुलांच्या भविष्यासाठी, त्यांचा आर्थिक भार उचलण्यासाठी, योग्य पालनपोषणासाठी तडजोड करण्याचा सल्ला स्त्रीला दिला जातो. हा विचारही केला जात नाही की, मन मारून जगणारी अस्वस्थ स्त्री घराचे वातावरण कसे स्वस्थ ठेवणार? विविध आकाराची छायाचित्रे जशी एकाच आकाराच्या चौकटीत बसवणे शक्य नाही, तसेच विविध विचारसरणी आणि प्रवृत्तीच्या सर्व व्यक्ती एकाच सामाजिक चौकटीत कशा बसू शकतील? स्त्रीवर्गाला आयुष्यभर त्या चौकटीची जाणीव आणि आठवण करून दिली जाते. ती चौकट मोडणाऱ्या स्त्रीला सतत टोमणे ऐकावे लागतात.

नवऱ्यावर प्रेम करणारी , त्याच्यासोबत संसार करणारी स्त्री आपले वेगळे अस्तित्व वा ओळख जगू शकते हे समाजाला सहसा मान्य होत नाही. स्त्रीची ओळख फक्त कोणाची मुलगी किंवा पत्नी म्हणूनच असू शकते ही धारणा पक्की आहे . पुरुषाची वेगळी ओळख किंवा अस्तित्व कोण्याही स्त्रीशी जोडली जात नाही.

मूलतः बुरशीटलेली विचारसरणी म्हणा किंवा स्त्रियांचे पाय ओढण्याची प्रवृत्ती म्हणा, स्त्रीचे चरित्र हनन करणे हा स्त्रियांना मागे खेचण्याकरिता हमखास वापरले जाणारे हत्यार आहे. स्त्रीची बदनामी केली कि , ती गप्प होईल, आपले ध्येय सोडेल, तोंड लपवून बसेल असे अपेक्षित असते. काही अंशी ती अपेक्षा पूर्ण होते तर काही स्त्रिया सगळा मानसिक छळ सहन करून, खडतर संघर्ष करून मार्गक्रमण करतात. दुर्दैवाने या मानसिक छळत अंगी कोणतेही कसब नसलेल्या, न्यूनगंडाने पछाडलेल्या इतर स्त्रियासुद्धा सहभागी असतात. एखाद्या स्त्रीवर अत्याचार झाल्यास पुरुष गुन्हेगाराला वाचवण्यात त्याचे समर्थन करण्यात इतर स्त्रियांची पुढे असतात. एका सिनेअभिनेत्याने घरातील अल्पवयीन मोलकरणिरवर बलात्कार केल्यानंतर तो कोर्टात सिद्ध होऊन त्याला शिक्षा झाल्यानंतरही त्याची बायको पत्रकारांना सांगत होती , "मला त्याची बायको असल्याचा अभिमान आहे" यावरून स्त्रियांची इतर स्त्रियांविषयीची मानसिकता दिसून येते. एका स्त्रीने आपल्या लेकीचा खून केला तेव्हा , आपली मुलं त्या स्त्रीच्या पदरात सोडून अज्ञातवासात गेलेला तिचा पती अचानक प्रकट होऊन त्या स्त्रीबद्दल पत्रकारांसमोर वाटेल ते बोलायला लागला. ज्या पुरुषाने आपल्या लेकीची कधीही जबाबदारी घेतली नाही, ज्याला माहितीही नव्हते की आपले लेख कुठे आहे. अशा पुरुषाला त्या प्रकरणात बोलण्याचा कोणत्याही अधिकार कसा काय मिळाला?

स्वप्ना वानखडे
संपर्क क्र. 7276734707



ज्या स्त्रियांना शिकण्याची, नोकरी करण्याची मुभा आहे ""त्यांना आम्ही तुम्हाला नोकरी करू दिली" असे उपकार केल्यासारखे उद्गार काही घरात काढले जातात. आजकाल आपल्या मुलापेक्षा जास्त शिकलेली जास्त पगार कमवणारी मुलगी फक्त आर्थिक फायद्यासाठी विवाहाच्या वेळी स्वीकारली जाते. ""आमची सून घरचे सगळे काम सणवार करून नोकरीही कशी उत्तम सांभाळते" हे कौतुकाचे शब्द सहसा ऐकायला मिळतात. प्रत्यक्षात आपल्या सुनेची सगळे सांभाळताना किती तारेवरची कसरत होत असेल हा विचारही ते करत नाहीत. याचे कारण म्हणजे, स्त्रीने नोकरी करताना घरातले सगळेच करावे ही अपेक्षा त्यांच्याकडून असते. "सर्वगुणसंपन्न स्त्री' असे गोंडस नाव अशा स्त्रियांना आजकाल दिले जाते. आईची किंवा स्त्रीची प्रतिमा देवी म्हणून पूजायची आणि आडून तिच्यावर जबाबदाऱ्या आणि अपेक्षांचे ओझे लादले जातात. ते तिला झेपले नाही किंवा तिने दुसऱ्या ध्येयासाठी ते झीडकरले तर मात्र तिला नावे ठेवली जातात.

राजकीय क्षेत्राकडे बघितल्यास असे लक्षात येते की, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद इत्यादींमध्ये महिला आरक्षणामुळे मुख्यत्वे राजकीय पार्श्वभूमीच्या महिलाच आढळतात. लोकसभा विधानसभा स्तरावर बघितल्यास स्वतंत्र पक्ष काढून स्वकष्टाने सत्ता काबीज करणाऱ्या स्त्रिया अविवाहित आहेत. धकाधकीच्या राजकीय जीवनात संसाराला वेळ देता न येणारी स्त्री सहसा लोक स्वीकारत नाहीत. विवाहित पुरुषाने मात्र घरच्यांना वेळ दिला नाही तर तेवढीशी तक्रार केली जात नाही, उलट त्यांना समजून घेण्यात येते. त्यांच्या संसारिक आयुष्यावर व्यस्त दिनक्रमाचा फारसा परिणाम दिसत नाही. अवघ्या एक महिन्याआधीपासून प्रकाशझोतात आलेल्या शिवसेनेच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी खडतर संघर्ष करून शिक्षण मिळवून जे स्थान निर्माण केले,ते खरोखरच वाखाण्याजोगे आहे. त्यांच्या वक्तृत्वाने सर्व विपक्षाच्या मनात धडकी बसवली. अशातच त्यांचे विभक्त असणारे पती विपक्षाच्या गळाला लागले. आणि त्यांनी सुषमा अंधारे बद्दल वाटेल ते घाणेरडे बोलायला सुरुवात केली. हा हिडीसवाणा प्रकार बघून कर्तुत्ववान स्त्रियांची वाट किती अंधारलेली आहे हे लक्षात येते. ती वाट प्रकाशमान व्हायला अजून बराच अवकाश आहे.

# जाहिरातीविना वाचनीय दिवाळी अंक : 'अक्षरगंध'



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**दिवाळी आली म्हणजे दीपोत्सव आला. आणि या दीपोत्सवा बरोबरच एक उत्सव असतो तो म्हणजे साहित्याचा उत्सव, अर्थातच ऐन दिवाळीत येणारे दिवाळी अंक दिवाळी अंक. म्हणजेच दिवाळीच्या फराळा बरोबरच मिळणारा साहित्य फराळ. दिवाळी अंकातून मिळणारा साहित्य फराळ हा ही तेवढाच महत्त्वाचा असतो. वाचकाच्या मनाला त्यातून एक वेगळाच आनंद मिळत असतो.**


दिवाळी अंकाची परंपरा खूपच जुनी आहे. 19 व्या शतकात पहिला दिवाळी अंक निघाला.मनोरंजन मासिकाचा चा दिवाळी अंक 1909 मध्ये प्रसिद्ध झाला. आता या गोष्टीला 110 वर्षे पूर्ण होऊन गेले आहेत. आणि या 110 वर्षात दिवाळी अंकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे बदल झालेले आहेत.आता शेकड्याचे संख्येने लहान मोठे दिवाळी अंक निघतात. काळानुसार त्याचे स्वरूप बदलत गेले आहे. काळाच्याओघात सत्यकथा, अंतर्नाद, यासारखे अंक बंदही पडलेत. साधारणपणे 1970 ते 2000 पर्यंत दिवाळी अंकात जसे साहित्य या प्रकाराला महत्त्व होते आणि त्याच्या जोडीला अंक काढण्याला मदत म्हणून जाहिरातीचा आधार घेतला जात होता. परंतु आता त्या नावाखाली आपल्याला दिवाळी अंकात जाहीरीतीच जास्त दिसतात हे सत्य नाकारून चालणार नाही. किंवा काही अंक तर केवळ जाहिरातीसाठी काढले जातात असे म्हणावे लागेल. आधिच्या या काळात साहित्या मध्ये तुरळक जाहिराती दिसत असत. परंतु आता त्या जाहिरातीतच तुरळकपणे साहित्य दिसते आहे. अर्थातच पाच दहा पाना नंतर एखादी कथा, कविता, किंवा लेख, असतो. कथाही अर्धीच असते आणि पुढील पानावरती छापली असते .असेच प्रकार आढळतात .गेल्या वर्षी तर माझ्या पाहण्यात एक अंक असा आला की त्यात जाहिरातीच जाहिराती होत्या, साहित्य शोधावे लागत होते. अर्थातच अशा प्रकारे दिवाळीअंक नावाखाली आर्थिक कमाई केली जाते हे मात्र योग्य नाही. थोडक्यात काय तर वाचकांवर जाहिराती लादल्या जातात. त्यात अजूनही भर म्हणजे अंकात लेखन करणाऱ्या लेखकांना, काही दिवाळी अंक विकत घेण्याचा आग्रह केला जातो किंवा जाहिरातीचे रूपाने मदत करा म्हणून आवाहन केले जाते. एक तर लेखकांना लेखाचे किंवा कथेचे मानधन मिळत नाहीत पण अशाप्रकारे अडवणूक केली जाते. आजही दिवाळी अंकात आणि वर्तमानपत्रात लेखन करण्याचे मानधन ठराविक दिवाळी अंक व वर्तमानपत्र देत असतात. दर्जेदार व नवीन विषय घेऊन अंक निघत नाही असे नाही. ऋतुरंग, अक्षर लिपी, अक्षरधारा, मोज, पुण्यभूषण, प्रतिबिंब, पद्मगंधा ,रुची ,अनुभव,तरुण भारत,असे अनेक दिवाळी अंक निघतात परंतु त्यात जाहिराती ह्या असतातच. परंतु...

यावर्षी दिवाळी अंक वाचताना एक दिवाळी अंक असाही नजरेस आला, आणि वाचला तो म्हणजे "अक्षरगंध".

"अक्षरगंध"अंकाचे संपादक-प्रकाशक मधुवंती सप्रे या आहेत. हा अंक जाहिराती विना आहे. एकही जाहिरात या अंकात नाही हे विशेष. अनेक वेगवेगळ्या प्रकारचे लेख आपल्याला वाचायला मिळतात. आणि निवडक कविता असे स्वरूप आहे. अंकात कथांचा समावेश नाही.

या अंकात एकूण आठ विभागात लेख आहेत. युग कन्या लता या विभागात गानसम्राज्ञी, भारतरत्न लता मंगेशकर यांच्या विषयी मधुवंती सप्रे, अविनाश प्रभावळकर आणि पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखाचा समावेश आहे. यामध्ये त्यांनी एकूणच लता मंगेशकर यांच्या विषयी आठवणी जाग्या केले आहेत. मधुवंती सप्रे आपल्या लेखात म्हणतात ऋषीमुनी, साध्वी, तपस्या करीत असत त्या स्वतःला पुण्य मिळावा म्हणून पण या साध्वीने गायनाची तपस्या केली ती लोकांना उत्तम गाणं आणि आनंद मिळवा म्हणून. मानवी भावना तिच्या स्वरातून काठोकाठ भरून वाहत होत्या. प्रेम दुःख,विरह वात्सल्य,माया, लोभ, आर्तता, या भावनांची उच्चतम कंपन

त्यांनी निर्माण केली. इतकी स्वरांची दुनिया तिला वष झालेली होती. तर पंडित हृदयनाथ मंगेशकर आपल्या लेखात म्हणतात भारतीय संगीत क्षेत्रात नाही तर जगाच्या संगीत इतिहासात दीदीचं स्थान आढळ आहे. सर्वोच्च होत आणि आहे .आणि प्रत्यक्षातही तिच वागणं बोलणं सार तितकंच ताज आणि टवटवीत होतं. शेवटी दीदी ही दीदीच आहे !अविनाश प्रभावळकर यांचाही असाच एक चांगला लेख या विभागात आहे. तर विभागाचे सुरुवातीलाच लतादीदी नावाची एक सुंदर कविता मधुवंती सप्रे यांनी लिहिली आहे. दुसऱ्या विभागात भास्कर बुवा बखले यांच्या संगीत कारकीर्द विषयी दीर्घ आढावा घेणारे,परिचय करून देणारे शैला दातार, आणि अजय मांजरेकर यांचे लेख आहेत. तिसऱ्या भागात मधु मंगेश कर्णिक यांच्या विषयी विलास खोले व मधुवंती सप्रे, अनुजा देशपांडे, यांचे लेख आहेत. त्यातून वाचकाला कर्णिक यांच्या साहित्याचा आणि साहित्य क्षेत्रात केलेल्या कार्याचा परिचय होतो. तर चौथ्या भागात विलक्षण कर्तुत्वशालिनी महिला अहिल्या रांगणेकर, रमाबाई आंबेडकर, आणि भानू अथैया, यांच्या विषयी लिहिलेले लेख आहेत. त्याच विभागात मेधा पाटकर, रेणुका शहाणे, जागृती गावकर यांचा लेख, सुरेखा दळवी यांच्या सामाजिक कार्याविषयी मिलिंद बोकील यांचा लेख सुनील




सुनिल सुकथनकरंचा लेख वाचनिय आहेत. पाचव्या विभागात मराठी भाषाआणि मराठीपण, भाषेची अभिजातता आणि समृद्धी बायकांची भाषा, माय मराठी, मरावे परी मराठी रूपे उरावे, असे दीपक घारे, माया पंडित, शारदा लिमये यांचे वाचनिय आणि चिंतनिय लेख आहेत.याच विभागात सई परांजपे यांनी मराठी भाषेचे होत असलेली अवहेलना आणि त्याबद्दल वाटणारी खंत त्यांच्या कवीतून व्यक्त केली आहे.

त्या म्हणतात

मराठी माझी मायबोली<br>
आता तर होती<br>
न सांगता.. न सवरता<br>
अचानक कशी गायब झाली.....

सहाव्या विभागात घाशीराम कोतवाल नाटकाच्या पन्नाशी निमित्त चंद्रकांत काळे दीपक घारे डॉक्टर मोहन आगाशे यांनी आपल्या आठवणी सांगितले आहेत तर व्यावसायिक रंगभूमी विषयी शांता गोखलें नी लिहिले आहे .टिळक आणि आगरकर हा विश्राम बेडेकर यांचा लेख आहे. सातवा विभागात सुनिता देशपांडे, सुरेश खरे, श्रद्धानंद ठाकूर ,डॉक्टर सरोज बावडेकर ,रवींद्र पाटील यांनी आपल्या घराविषयी आठवणी ,तिथे आलेले अनुभव, तिथला परिसर,निसर्ग सौंदर्य, तिथे भेटलेली माणसं, त्या ठिकाणी केलेले लिखाण याविषयी सविस्तर लिहिले आहे. तर रंग कवितेचे या आठव्या विभागात अगदी ठराविकच कवींच्या कविता आहेत. त्यात राजीव जोशी, श्वेता चिटणीस, चंद्रकांत गोविंद कुलकर्णी, दिलीप कुलकर्णी ,शाम पेंढारी यांचा समावेश आहे. शेवटी मर्ढेकर यांच्या प्रेम कवितेवरचा सप्रे यांचा दिर्घ लेख आहे.

एकूणच अंक वाचनीय असा आहे. त्यातली अनेक लेख चिंतनीय पण आहेत.

असा हा "अक्षरगंध"चा दिवाळी अंक जाहीरातीविना आहे. एकही जाहिरात त्यात नाही. त्यामुळे माझ्या मनात उत्सुकता निर्माण झालेनी मी संपादिका आणि प्रकाशिका मधुवंती सप्रे यांच्याशी मुद्दाम फोनवर बोललो. त्यावेळेस त्यांनी सांगितले की... "गेली तेरा वर्ष मी हा अंक असा जाहीराती विना काढत आहे. लेखकांना योग्य ते मानधन दिले जाते. अंक प्रंसिध्दी आधिच मानधनाचा चेक पोहचतो असेही त्यांनी सांगितले. आजच्या काळात पेपर महाग आहे. परवडत नाही. परंतु संत ज्ञानदेव, संत नामदेव तुकाराम मुक्ताई यांनी वैभवाच्या कळसापर्यंत नेलेली मराठी भाषा म्हणून आपल्या मायबोलीसाठी परवडत नसतानाही मी अंक काढत आहे. त्यात जवळपास 40% तोटा होत असतानाही तो मी सहन करत आहे. आणि विशेष म्हणजे तेरा वर्षात जवळपास शंभर स्त्रियांचा सर्व प्रांतातले कर्तुत्व वाचकांसमोर आणले आहे. हीच माझ्या अंकाची जमेची बाजू आहे."

आजच्या स्पर्धा, जाहिराती युगात, जाहिरात मिळतील, मिळत असतील. परंतु निखळ साहित्याचा आस्वाद वाचकांना देता यावा म्हणून त्यांनी अक्षरगंध हा अंक सुरू ठेवला आहे ही खूपच मोठी गोष्ट आहे. त्यामुळे या निमित्ताने वाचकांच्या वतीने त्यांचे आभार मानायला हवे. तसेच अभिनंदन ही करायला हवे. फक्त एकच आहे की असे अंक वाचकांनी खरेदी करून वाचणे आवश्यक आहे.

**अक्षरगंध, शब्दरत्न प्रकाशन. मुंबई, संपर्क : ९८२११७५३४९**

# पत्रकारिता देश व समाज घडविण्याचे मोठे माध्यम



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे.जागतीक हालचाली, कळत-नकळत घटना,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण हालचाली किंवा माहिती 130 कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. 16 नोव्हेंबर 1966 ला प्रेस काउन्सिल ऑफ इंडियाने राष्ट्रीय पत्रकारितेच्या निमित्ताने एक कार्यक्रम घेतला व यामध्ये ठरविण्यात आले की दरवर्षी 17 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा करण्यात येईल. तेव्हापासुन प्रत्येक वर्षी 17 नोव्हेंबरला राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा केल्या जातो.**

1920 मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दर्शनिक जॉन डेवी यांनी लोकतान्त्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता,जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो.प्रत्येकबाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत, सरकारपर्यंत व प्रशासनापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन,वेब-पत्रकारिता, सोशल मिडिया यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वतःच्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते व देशाचा पाया मजबूत होतो यालाच म्हणतात चौथास्तंभ. पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता,कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात.पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून धारधार लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात. पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता एडीचोटीचे प्रयत्न करीत असतो म्हणजेच उन, पाऊस, थंडी, सुनामी,खडतडवाट यांचा विचार न करता माहिती गोळा करतो व समाजापर्यंत पोहचवितो.



तेव्हा देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो.वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात.यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते.आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते.1832 साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय.यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी"टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविलेल्या जात होती.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुर्दशन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे.टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो सरकारने उधळुन लावला.17 नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे.देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते.पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना प्रशासनाने, केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे.

# हास्याशिवाय पर्याय नाही!

आज दैनंदिन जिवन जगताना मनुष्याला प्रचंड, धावपळ, ताणतणावाला सामोरे जावे बहुतांश वेळा आरोग्याच्या तक्रारी देखील ऊदभ्वत असतात. या जगण्यच्या धडपडीतून आज माणसाचे हास्य लोप पावत चालले आहे. आपल्याला जिवनात आपले आरोग्य उत्तम टिकवून ठेवायचे असेल तर जिवनात आपल्याला हास्याशिवाय पर्याय नाही. हास्य ही मानवाला मिळालेली नैसर्गिक देणगी म्हणावी लागेल. हास्य हे काही आपल्याला काही बाजारातून विकत घ्यावे लागत नाही.हास्य टॉनिक आपल्या जवळच आहे. फक्त त्याला ओळखता आलं पाहिजे.

आपण दिवसातून किती वेळा हसतो. याचा आपण कधी विचारच केला नाही. हास्य आपल्या जिवनाचा मुलभूत घटक आहे. आपला चेहराच सांगतो आपण कसे आहोत ते आपला चेहरा जर रडक्या स्वभावाचा असेल तर आपल्याकडे कोणी सुद्धा पाहणार नाही. आणि आपला चेहरा हासरा असेल तर तो सर्वांनाच आवडतो. आपली समाजामध्ये प्रतिमा उंचावयाची असेल तर हास्य हे असे औषध नक्कीच उपयोगी पडणारे आहे. हास्यामुळे आपल्याला अनेक मित्रपरिवार मिळू शकतो. हास्य हे आरोग्यासाठी संजिवनी ठरलेले आहे. कारण जेव्हा आपण हसतो तेव्हा चेहऱ्याचे, पाठीचे, मानेचे, खांद्याचे, छातीचे, पोटाचे स्नायू या अवयवांचा व्यायाम होत असतो. हसल्याने मेंदुही कार्यान्वित होतों. रक्ताभिसरणाचे कार्य देखिल चांगले चालण्यास मदत होते.

हसणं हे शरीराला स्पर्श, संवेदना देत असते. हसल्याने व्यक्तीच्या शरीरामधून सिरॅनॉमिक नावाचे रसायन हार्मोन्स बाहेर पडतात. त्यामुळे आपण आनंदी उत्साही दिसतो. निराशा आणि ताणतणावापासून मुक्तता मिळते. हास्य विनोद आणि तंदूरूस्त शरीर यातून प्रत्येकजण आपण दुःखावर मात करू शकतो. तीन वर्षांचे मुल दिवसभरातून तीनशे ते पाचशे वेळा हसते . जेव्हा लहान मुल हसते तेव्हा त्यांच्या चेहर्यावरचे भाव पहा कसे गुटगुटीत दिसत असते.परंतू जसं जसं माणसाचे वय वाढत जाते तसे तसे माणसाचं हसु लुप्त होत जाते.आपल्या जिवनात अनेक दुःखाचे प्रसंग येत असतात.यासाठी हास्याचे अमृत आपल्याकडे नक्कीच आहे.

मोठी माणसे दिवसभरातून दहा ते पंधरा वेळा स्मित हास्य करत असतात.वय वाढत गेलं माणसाचं हसणे कमी होते .

**-संतोष दत्तू शिंदे,** काष्टी, ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर

# सहनशीलता बातांत नाही, कृतीत स्पष्ट !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**सहनशील व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत उदास होत नाही, खचून जात नाही. ती राईचा पर्वत करत नाही, उलट राईलाही राईसमानच अनुभवते. येशू ख्रिस्तानेदेखील मरतेवेळी सांगितले, की हे प्रभो, त्यांनी मला जिवे मारले ते अज्ञानी आहेत. त्यांना तू क्षमा कर. जी व्यक्ती स्वामी दयानंदांना विष देण्यास निमित्त बनली, त्या व्यक्तीलाही स्वामींनी क्षमा केली. गुरू गोविंदसिंगांची दोन छोटी मुले हसत-हसत भिंतीत चिणली गेली. संत मीराबाईनेही प्रभुप्रेमामुळे विषाचा प्याला सहजगत्या स्वीकारला. संत एकनाथजी देखील सहनशक्तीचा मेरुमणी होते. सहन केल्याने आपली मनाची शक्ती वाढते व आपली पवित्रताही दुगुणीत होते. सहनशील माणसाची लक्षणे अशी, की कोणी त्याची निंदा करो, त्याच्याशी कठोरतेने बोलो, मात्र त्याचा चेहरा आनंदी राहतो.**

जगात जेवढे म्हणून तंटे-बखेडे होतात, त्यांचे मूळ कारण म्हणजे कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाचा अभाव हेच आहे. माणसामाणसांमध्ये जी भिन्नता आढळून येते, तीसुद्धा कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाच्या उणिवेमुळेच होय. तेव्हा दुर्गुण सोडून दिव्य गुण धारण करण्यासाठी प्रोत्साहन देणे, हेच जगातील सर्व तत्त्वज्ञानाचे व धर्मग्रंथाचेही उद्दिष्ट आहे. नागरिकांची बांधिलकी या चळवळीसाठी ते आवश्यक आहेत. आजचा विश्व सहनशीलता हा दिवस याच संदेशासाठी प्रायोजित केला आहे. मतभिन्नता किंवा दुसऱ्याची मते लादून घेणे म्हणजे सहनशीलता नव्हे, तर परस्परावरील आदराने आणि एकमेकांशी समेट करून जगण्याचा तो एक मार्ग आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे, हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. माणसातील अंतर्मुखता, गांभीर्य, धैर्य, शीतलता, नम्रता, संतुष्टता, सरलता हे सर्वही दिव्य गुण आहेत. या सर्वही गुणांमध्ये आणखी एक महान गुण आहे सहनशीलता. कोणतेही श्रेष्ठ उद्दिष्ट गाठायचे म्हणजे सारे काही सहन करावे लागते.

"खोद खाद धरती सहे, काँट कूँट बनराय| कटु वचन साधु सहे,
औरौं को सहा न जाए||"

दि. १६ नोव्हेंबर १९९५ पासून हा दिवस साजरा करण्यात येतो. मानवी मूलभूत हक्कांची जोपासना करीत असताना, मानवतेची अस्मिता जपताना, मानवी मूल्यांची कदर करीत आपल्या पुढच्या पिढीला युद्धाच्या अरिष्टापासून वाचविण्यासाठी असहनशीलतेचा अंत व्हावा, या उद्देशाने युनेस्कोने या दिवसाची घोषणा केली होती. मानवी बुद्धिमत्ता आणि एकजूट यांचा वापर करून पृथ्वीवर सर्वत्र व सतत शांती पसरावी, यासाठी राष्ट्रकुल सतत प्रयत्नशील असते. आजचे जग दहशतवाद, जातीयवाद, हिंसा, प्रांतीयवाद, तीव्र राष्ट्रीयता, मूलतत्त्ववाद आदींमुळे अस्वस्थ आहे. म्हणून राष्ट्रकुल आपल्या सदस्य राष्ट्रांना आवाहन करते, की जात, धर्म, भाषा, लिंग, राष्ट्र असे भेदभाव बाजूला सारून सकलांनी मानवतेच्या उद्धारार्थ सहनशीलतेची कास धरली पाहिजे. सहनशीलता हाही एक सद्‌गुण आहे व त्यामुळे सर्वत्र शांती नांदते. इतकेच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस हातभार लागतो. त्यासाठी राज्यपातळीवरील कायद्याने सर्व नागरिकांना समान हक्क दिले पाहिजेत. समाजातील विविध गटात मतभेद होऊ शकतात. पण ते मिटविण्यासाठी समर्थ यंत्रणा देखील कार्यरत असायला हवी. सहनशीलतेचा प्रसार होण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. सन २००५च्या विश्व परिषदेत या घोषणेचा पुनरुच्चार होऊन राष्ट्रीय नेत्यांनी आणि त्यांच्या सरकारांनी सहनशीलतेला उत्तेजन देऊन वेगवेगळ्या समाजगटात, संस्कृती विभागात तसेच लोकांमध्ये संवाद घडवून आणला पाहिजे. त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना रूजवून प्रगतीच्या दिशेने नेण्यास प्रयत्न असावेत. हा दिवस साजरा करण्यासाठी दहा मुद्यांवर भर दिला जातो- १) समाजातील विविधतेचा अभ्यास करा. अनेक वाद्ये एकत्रित येऊन वाद्यवृंद कर्णमधूर संगीत निर्माण करतो, हे उदाहरण लक्षात ठेवा. २) समाजातील विविध घटकांना, मग ते धामिर्क असोत, जातीय असोत, भाषेचे असोत, त्यांच्या मानवी हक्कांची जोपासना करा.३) स्वतःची अशी सहनशीलता प्रकल्पाची योजना आखा. स्वतःची दुसऱ्यांच्या जागी कल्पना करून बघा. ४) घरीदारी, शाळा-कॉलेजमध्ये, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक स्थळी हिंसेला थारा देऊ नका. ५) हवामान आणि पर्यावरण सगळ्यांशी सारख्याच प्रमाणात निगडीत असते. तेव्हा पर्यावरणाचा एखादा प्रकल्प राबवून सर्वांना एकत्र आणा. ६) सणावारी सर्वधर्मसमभाव प्रेरित करण्याचे मेळावे आयोजित करा. निरनिराळ्या धर्मातील तत्त्वांचा अभ्यास करा. ७) एखादी ताजी घटना घडली असेल तर तिचा उहापोह करण्यासाठी तज्ज्ञांची चर्चासत्रे भरवा. त्या घटनेचे मूळ कारण सकलांना कळू द्या. ८) खेळक्रीडांचे सामने सहनशिलता अंगी मुरविण्यास बऱ्यापैकी हातभार लावतात. समाजात खिलाडू वृत्ती रुजविण्याचा प्रयत्न करा. ९) आपली क्रयशिलता वापरून नवनिमिर्ती करा. कथा, नाटक, कविता, गाणी, लेख, चित्र, छायाचित्र याद्वारे सहनशिलतेचे गुणगान गा. १०) आपल्या कार्याद्वारे जागतिक पातळीवर सहनशिलतेचा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी युनेस्कोच्या असोशिएट प्रोजेक्टमध्ये सहभागी व्हा.




एकदा एक गुराखी चरण्यासाठी जंगलात घेऊन गेला होता. गुरांना चरण्यासाठी सोडून दिल्यावर एकटाच एका झाडाखाली बसला. वेळ घालवण्यासाठी म्हणून जवळच पडलेल्या एका दगडाने दुसऱ्या दगडावर आघात करू लागला. दोन-तीन आघात झाल्याबरोबर तो दगड तुटला व थोड्या अंतरावर जाऊन पडला. गुराख्याने दुसरा दगड घेतला व आता या दगडावरही तो तसेच आघात करू लागला. या दगडाने मात्र ते सर्व घाव सहन केले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे संध्याकाळपर्यंत त्या दगडाचे एका सुंदर मूर्तीत रूपांतर झाले. त्या गुराख्याने ती मूर्ती तेथेच ठेवली व गुरांना घेऊन निघून गेला. रस्त्यावरून जाणाऱ्या शेतमजुरांना जेव्हा ती मूर्ती दिसली तेव्हा त्यांना वाटले, की हा तर चमत्कारच झाला. सकाळी तर येथे मूर्ती नव्हती. प्रभूने आपल्यासाठीच ही मूर्ती पाठवली असेल. अवश्य आपणास या मूर्तीसाठी मंदिर बनवावे लागेल, असे म्हणून ग्रामस्थांनी सगळ्यांच्या सहयोगाने तेथे मंदिर बनवून त्यात या मूर्तीची स्थापना केली. या मूर्तीवर वाहण्यासाठी नारळ फोडायला दगड हवा होता म्हणून एक ग्रामस्थ खाली पडलेला एक दगड उचलतो तर तो तोच दगड असतो जो त्या गुराख्यांच्या फक्त दोन-तीन प्रहारांनी तुटलेला असतो. त्याला मंदिराच्या दरवाजाजवळ ठेवले जाते. आता रोज त्याच्यावर नारळ फोडले जातात. एकदा कुणीही नसताना त्या मूर्तीने अचानक दरवाजातील दगडाला विचारले, काय मित्रा, कसा आहेस? तेव्हा उत्तरादाखल दगड म्हणाला, की काही नको विचारू बाबा. दिवसभर झालेल्या आघातांना तू सहन केलेस म्हणून आता तुझी पूजा होते आहे, पण मी मात्र एक-दोन आघातांनी घाबरून गेलो. आता मात्र रोजच माझ्या शरीरावर आघात होत आहेत. याचा पश्चात्ताप मला आयुष्यभर होतच राहील. म्हणूनच म्हटले जाते, की "टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही." दगडापासून मूर्ती जेव्हा घडत असते, तेव्हा तिला घाव मोठ्या आनंदाने सहन करावे लागतात. याउलट जे दगड हे घाव न सोसता तुटून पडतात. त्यांचा वापर मंदिराच्या बांधकामात केला जातो. सागराच्या किंवा नदीच्या लाटांशी टक्कर देत देत त्यातील दगडही पूजनीय प्रतिमा शालिग्राम बनतात.

"सहनशीलता धारण करीत
देवत्व येई अंगी| अन्यथा
मूर्ती ती अपुरी, पूजन न
होई जगी||"

मात्र बऱ्याच अंशी जनमानसात सहनशीलतेचा अभाव दिसतो. आम्हीच का म्हणून एवढे मोठे दुःख सहन करायचे, असा प्रश्न सगळ्यांना सतावत असतो, माझ्याऐवजी दुसरा कोणी असता तर कधीच एक घाव दोन तुकडे करून मोकळा झाला असता. आपल्याला वाटते, समोरची व्यक्ती बदलत नाही, परंतु आपण तर बदलू शकतो ना? आपली कृती त्याची वृत्ती बदलू शकते. म्हणूनच असे म्हटले जाते-

"बदल न लो, बदल के दिखाओ।"

सहनशील व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत उदास होत नाही, खचून जात नाही. ती राईचा पर्वत करत नाही, उलट राईलाही राईसमानच अनुभवते. येशू ख्रिस्तानेदेखील मरतेवेळी सांगितले, की हे प्रभो, त्यांनी मला जिवे मारले ते अज्ञानी आहेत. त्यांना तू क्षमा कर. जी व्यक्ती स्वामी दयानंदांना विष देण्यास निमित्त बनली, त्या व्यक्तीलाही स्वामींनी क्षमा केली. गुरू गोविंदसिंगांची दोन छोटी मुले हसत-हसत भिंतीत चिणली गेली. संत मीराबाईनेही प्रभुप्रेमामुळे विषाचा प्याला सहजगत्या स्वीकारला. संत एकनाथजी देखील सहनशक्तीचा मेरुमणी होते. सहन केल्याने आपली मनाची शक्ती वाढते व आपली पवित्रताही दुगुणीत होते. सहनशील माणसाची लक्षणे अशी, की कोणी त्याची निंदा करो, त्याच्याशी कठोरतेने बोलो, मात्र त्याचा चेहरा आनंदी राहतो. त्यावर मलूलतेचे चिन्ह दिसत नाही. गीतेतही म्हटलंय-

"तुल्यनिंदा स्तुतिर्मोनि संतुष्टो येन केनचित!"

अर्थात प्रत्येकाला जीवनात मान, अपमान, निंदा, हार, जीत यांचा सामना करावाच लागतो. परंतु विपरीत परिस्थितीतही सहनशीलता आपणास शांत व अचल, मुख्य म्हणजे आनंदात ठेवू शकते.

एकदा गौतम बुद्ध आपल्या शिष्यांना म्हणाले, की मी तुम्हाला एका बिकट कामगिरीसाठी जवळच्या प्रदेशात पाठवणार आहे. तेथील लोकांना तुम्ही काही सांगितले व त्यांनी तुमचे ऐकले नाही तर तुम्ही काय कराल? शिष्यांनी उत्तर दिले, की तथागत, असे झाले तर आम्ही समजू येथील लोक फारच चांगले आहेत. त्यांनी आमचे ऐकून घेतले नाही हे खरे. पण उलटून शिव्या दिल्या नाहीत. यावर तथागत म्हणाले, की ठीक आहे. त्यांनी तुम्हाला शिव्या दिल्या, काही अपशब्द वापरले तर तुम्ही काय कराल?'' शिष्य म्हणाले, की तरीदेखील आम्ही समजू इथले लोक चांगले आहेत. त्यांनी आम्हाला फक्त शिव्याच दिल्या, मारहाण तर केली नाही. पुन्हा तथागत म्हणाले, की जर त्यांनी तुम्हाला मारलं तर? शिष्य म्हणाले, की आम्ही म्हणू की हे लोक किती चांगले आहेत, कारण यांनी आमचा जीव तर घेतला नाही. पुन्हा तथागत म्हणाले, की समजा, त्यांनी तुमचा जीव घेण्याचा प्रयत्न केला तर? शिष्य म्हणाले, की आम्ही असेच समजू की या प्रदेशातील लोक सज्जन आहेत. त्यांनी आम्हाला भगवंताचे काम करतानाच भगवंताच्या पायापाशी पोहचवले? शिष्याचे हे उत्तर ऐकून तथागत हसले व म्हणाले, की तुम्ही परीक्षेत उत्तीर्ण झालात. अशा प्रकारची पराकोटीची सहनशीलता अंगीकारल्यामुळे तुम्हाला कुठेही हमखास यश प्राप्त होईलच, यात मुळीच शंका नाही.

कधी-कधी किरकोळ गैरसमजुतींनी अनेक वर्षांची मैत्री, ऋणानुबंध धोक्यात येतात, केवळ सहनशक्तीच्या कमतरतेमुळे हे घडते. परंतु तुमच्याशी उगाच वैर बाळगणाऱ्या, तुमच्याशी भांडणाऱ्या विरोधकाचाही तुमच्या मधुर शुभभावना व शुभकामनांद्वारे सहनशीलतेचा पाठ तुम्ही शिकवू शकता. एका ऑफिसात काही दिवसांपूर्वी घडलेली एक गोष्ट आठवते. एक ऑफिसर त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या एका कारकुनाला अद्वातद्वा बोलला. त्या बोलण्यात शिव्यांचाही समावेश होता. तरीही तो कारकून मात्र शांत उभा होता. त्याच्यावर आपल्या बोलण्याचा काहीएक परिणाम होत नाही, असे पाहून तो अधिकारी आणखी चिडला. त्याचा राग एवढा नियंत्रणाबाहेर गेला की अक्षरशः तो त्या कारकुनाच्या अंगावर थुंकला. तरीही तो कारकून शांतपणे समोर असलेल्या वॉश बेसिनकडे गेला व त्याने आपला चेहरा धुतला व तसाच पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसला. ते पाहून त्याचा अधिकारी वरमला. तो त्याच्या टेबलाजवळ आला व त्याला विचारू लागला, ''मी तुझ्याशी एवढं वाईट वागलो तरीही तू एक चकार काढला नाहीस हे कसे काय?'' तेव्हा तो कारकून म्हणाला, ''जे काम फक्त पाण्याने होऊ शकते ते करण्यासाठी मी दगड का हातात घेऊ?'' हे ऐकल्याबरोबर त्या अधिकाऱ्याचे हृदयपरिवर्तन झाले. सहनशीलतेची शक्ती ही आपली अविनाशी दौलत आहे. ही दौलत प्रत्येकाला वाढवायला हवी. स्वतःच्या कल्याणासाठीच नव्हे तर इतरांच्याही भल्यासाठी विश्वच माझे घर ही संकल्पना आपणास मान्य आहे. म्हणून सर्व आपल्यांसाठी सहनशीलतेची कास धरावीच. म्हटले जाते-

"जो सहन करतो, तोच शहेनशाह बनतो!"

!! जागतिक सहनशीलता दिनानिमित्त सहनशील होण्यास सर्व बांधवांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# माजी सैनिकांना शारीरिक शिक्षक म्हणून नेमणूका कशासाठी ?

आधुनिक केसरी

नुकतेच चार-पाच दिवसापूर्वी सध्याचे शालेय राज्य शिक्षणमंत्री मा. दिपकजी केसरजी यांनी निर्णय घोषित केला की, यापुढे जि.प. प्राथमिक शाळा व सैनिकी शाहांवर शारीरिक शिक्षक म्हणून (रिटायर्ड) माजी सैनिकांच्या नेमणुका केल्या जाणार. हा निर्णय म्हणजे राज्यभरातील हजारो शारीरिक पदवीधर निदेशक शिक्षक हे बेरोजगार, बेकार आहेत. मागील ५ वर्षापासून या पदाची कोणतीही भरती नाही. यामुळे दरवर्षी बेरोजगाराच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. हाताला काम नाही, नोकरी नाही, इतर पदाचाही जागा भरल्या नाही. यामुळे हे सर्व हजारो निदेशक शिक्षक उपासमारीचे जीवन जगत आहे.

तसेच मागील तीन महिन्यांपासून हे नवीन सरकार सत्तास्थानी आल्यापासून मा. मुख्यमंत्री, मा. शिक्षणमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. मागील २८ वर्षापासून शारीरिक शिक्षक, कला शिक्षक, कार्यानुभव शिक्षक, निदेशक यांची भरती शिक्षण विभागात नाही. जे २०११-१२ पासून १५ हजार निदेशक शिक्षक, क्रीडा, कला, कार्यानुभव जि.प.शाहा व मनपा शाहांवर सेवास्त कार्यरत होते, या सर्वांना नौकरीवरुन २०१४ ला कमी करण्यात आले. या सर्वांना कायमस्वरुपी नेमणूका राज्य सरकार शिक्षण विभागाने द्याव्यात असे मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद, नागपूर, मुंबई यांनी राज्य सरकारला आदेश केले आहे. परंतु मागील सरकारने व महाविकास आघाडी सरकारनेही या आदेशाची अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखवून या तमाम निदेश्कांना नौकरीपासून वंचित ठेवून बेकारीच्या व उपासमारीच्या खाईत ढकलले.

या सर्व क्रीडा, कार्यानुभव, निदेशकांना न्यायालयाच्या निकालानुसार त्वरीत नेमणूका द्याव्यात म्हणून शिक्षक-कर्मचारी संघटना व अंशकालीन निदेशक शिक्षक संघाची सर्व पदाधिकारी मा. मुख्यमंत्री, मा. शिक्षणमंत्री यांना चार-पाच वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी करत आहे.

तर तुमचा प्रश्न आम्ही लवकर मार्गी लावू असे स्वतः मुख्यमंत्री व मा. शिक्षणमंत्री आम्हाला खात्रीलायकपणे आश्वासन देत आहे. आम्ही तुमच्या हिताचे सरकार, सकारात्मक आहोत अशी एकीकडे समोरा समोर भुमिका घेत आहेत. तर मग दुसरीकडे माजी सैनिकांच्या नेमणूका शारीरिक शिक्षक म्हणून करणार हा अन्यायकारक दुपट्टीपणाचा निर्णय कशासाठी ? एक तर मागील दहा वर्षापासून नंतर २०१९ ते २०२१ या दोन वर्षाच्या कोरोना सावटामुळे हा निदेशक नौकरीच्या व उपासमारीच्या खाईत होरपळून निघत आहे. तसेच दरवर्षी शिक्षक दिनाच्या मुर्हुतावर मा. शिक्षणमंत्री जाहिरपणे सांगतात की, बालकांना, विद्यार्थ्यांना २००९ च्या शासकीय जी.आर. नुसार क्रीडा, कार्यानुभव, कला शिक्षण घेण्याचा हक्क व अधिकार हा अनिवार्य केलेला आहे. तर दर वर्षी येते नि निघून जाते, जागा भरत नाहीत. या आदेशाची पायमल्ली केली जाते. यामुळे हजारो विद्यार्थ्यांचेही या कला, क्रीडा, कार्यानुभव शिक्षणाचे फार मोठे नुकसान होत आहे. या शिक्षणापासून सरकार अजून किती दिवस विद्यार्थ्यांना वंचित ठेवणार ?

तरी सध्याचे सरकार, आमचे सरकार, सर्वांच्या मनातले, सर्वांच्या हिताचे, सर्वांच्या आवडीचे सरकार असे स्टेजवर जाहिर करण्ययात स्वतः मा. मुख्यमंत्री, मा. दिपकजी केसरजी सांगतात. त्यानुसार नुसती वाच्यता नको तर प्रत्यक्षात कार्यवाही करावी.

करीता माजी सैनिकांना शारीरिक शिक्षक म्हणून नेमणूका कशासाठी? शिक्षण मंत्र्यांचा हा निर्णय हाजारो शिक्षक निदेशक, पदवी बेरोजगांराना उपासमारीच्या खाईत ढकलणारा.

**-मल्हारराव नाचण डोणगांवकर**
**औरंगाबाद मो. ९६३७९३७५७९**

# संत चोखामेळा

आधुनिक केसरी

यादव काळातील नामदेवांच्या संतमेळ्यातील वारकरी संतकवी होते. चोखामेळांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा किंवा मेहुणपुरी या गावी झाला. संत चोखामेळांचे कुटुंब हे जातीने महार होते. (चोखामेळांचा जन्म पंढरपूरलाझाल्याचे संत महिपती सांगतात. चोखामेळा मूळ वऱ्हाडातील आहेत असेही म्हटले जाते. त्यांचा मृत्यू गावकुसाच्या कामात दरड कोसळून झाल्याचे सांगितले जाते. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या हाडांतून विठ्ठल नामाचा गजर ऐकू येत होता, यावरून नामदेवांनी चोखामेळांची हाडे ओळखून ती गोळा केली व पंढरपूरला विठ्ठल मंदिरासमोर त्यांची समाधी बांधली असे चरित्रकार सांगतात. संत चोखामेळा हे एक, संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरू होत. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखामेळा होरपळून निघाले. ते शूद्र-अतिशूद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात अडकले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावगाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्य, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. श्रीविठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उराउरी भेटावे असे खूप वाटत होते. परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती. चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवांमुळे १३व्या शतकात उदयाला आली. म्हणून संत चोखामेळा म्हणतात, 'खटनट यावे, शुद्ध होऊनी जावे। दवंडी पिटीभावे डोळा।।' असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळातील लोकांनाही मिळावी असे ज्ञानेश्वरादी सर्वच संतांना प्रांजळपणे वाटत होते. त्याच वेळी संत चोखामेळांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगांतून समाजबांधवांना दिला. संत चोखामेळांचे भावविश्व अनुभवण्याचा प्रयत्न केला असता, एक मूक आक्रंदनाचा अनुभव येतो. संस्कारसंपन्न, संवेदनक्षम, भक्तिप्रवण, आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या चोखामेळांच्या रचनांतून, त्यांच्या आंतरिक वेदनांचे सूर छेडलेले जाणवतात. 'हीन मज म्हणती देवा। कैसी घडो तुमची सेवा।'

**क्रमशः**

# भारत जोडो जनमानसात रुजविणारी लोकायत

## पोवाडे, गाणी आणि पात्रके वाटून प्रबोधन; एक लाख पत्रकांचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** 'भारत जोडो यात्रा' का आणि कोणासाठी काढली ? ते कधी छापील पत्रकाद्वारे, तर कधी वांमनदादा कर्डक यांच्या गीतांतून, कधी संवाद साधून तर कधी छत्रपतींचा पोवाडा गाऊन.... रस्त्यांवरील उतरलेल्या जनतेमध्ये ही यात्रा रुजवण्याचे काम पुण्याची "लोकायत" संस्था करत आहे. त्यांच्या प्रबोधनाने जनतेला बोलते केले आहे. अठरा ते चाळीस वयोगटातील तीस तरुणांचा हा ग्रूप आहे. कोणी शिक्षणात तर कोणी नोकरीत व्यस्त आहे. नोकरदार तरुण वर्गणी काढून समाजात जनजागृतीचे काम करतात. नव्या पिढीला सामाजिक मूल्यांचे प्रशिक्षण देतात. आम्ही जे काम करतो, त्याच उद्देशाने राहुल गांधी पदयात्रा काढत आहेत. म्हणूनच आम्ही यात्रेत सहभागी झालो असल्याचे त्यांनी सांगितले. "सध्या मुलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यासाठी समाजात फूट पाडली जात आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे महागाई, बेरोजगारी वाढत आहे हे लोकांना पटवून देतो. देगलूर ते वाशीम पर्यंत रोज सुमारे 8 हजारप्रमाणे आतापर्यंत 1 लाख पत्रके वाटली. नांदेडच्या सभेत 18 हजार पत्रके दिली," अशी माहिती रुषल हिना यांनी दिली. माझ्या शिवरायांच्या छताखाली कधीच नव्हते वाण, आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान.... अशी गाणी सादर करून शिवरायांनी रयतेच्या हितासाठी केलेल्या आज्ञा, सर्वधर्मीय समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी त्यांची धोरणे, त्यांचा इतिहास, याची माहिती आम्ही देतो. त्यातून ते बोलते होतात. आक्रोश, आपल्या व्यथा मांडतात. स्वतंत्र्यपूर्व काळात देशासाठी काँग्रेसने दिलेले योगदान सांगतात. तेव्हा त्यांना ही यात्रा समजली असे आम्ही मानतो आणि पुढे जातो," असेही रुषल यांनी सांगितले.



# कॉपीमुक्ती नावालाच; कॉपीयुक्त अभियानाची जय्यत तयारी सुरु

## शिक्षण विभागाचे दुर्लक्ष : महाविद्यालय नियमांची करते पायमल्ली

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील जवळजवळ 70 टक्के पेक्षा जास्त महाविद्यालयिन विद्यार्थी महाविद्यालयात अनुपस्थित राहत असून याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असून शैक्षणिक विकासासाठी विद्यार्थ्यांची शेकडा उपस्थिती सुद्धा महत्वाची असतेच. वैजापूर तालुक्यातील बरेच महाविद्यालयिन विद्यार्थी हे खाजगी शिकवनीला महत्व देत असल्याने महाविद्यालयात नाम मात्र प्रवेश घेऊन उपस्थित राहत नाही तरीही महाविद्यालयात या विद्यार्थी यांची शेकडा उपस्थिती कसे काय पूर्ण करतात. वैजापूर तालुक्यातील काही महाविद्यालयात नाशिक मनमाड मुंबई येथील ही विद्यार्थी प्रवेश घेतात व जास्तीची फीस भरून प्रात्यक्षिक परीक्षा बोर्ड परीक्षा व अंतर्गत महाविद्यालयिन बरेच काम बाहेरूनच पूर्ण करताना दिसून येतात तरीही अश्या विद्यार्थ्यांची उपस्थिती दाखवून कॉपीयुक्त अभियान राबवून पैसे कमविण्याचा गोरखधंदा वैजापूर तालुक्यातील



बऱ्याच महाविद्यालयात दिसून येत आहे याकडे संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष तर करत नाही ना असा प्रश्न यावेळी निर्माण होतो. शाळा महाविद्यालय विद्यार्थ्यांची उपस्थिती कमीतकमी 75% असणे गरजेची असताना तसेच कोरोना नंतर शाळा महाविद्यालय सुरळीत पणे सुरु झालेली असताना सुद्धा हजेरी पटावर असलेली उपस्थित संख्या तसेच दैनंदिन महाविद्यालयात उपस्थित असलेली विद्यार्थी संख्या फार कमी दिसून येते याकडे संबंधित विभागाने लक्ष्य केल्यास तालुक्यातील बऱ्याच महाविद्यालयात उपस्थिती बाबत तफावत आढळेल. शाळेसारखी महाविद्यालयिन विद्यार्थ्यांची शेकडा उपस्थिती गरजेची आहे का नाही, असेल तर महाविद्यालयाची अचानक पणे धावती भेट घेऊन पाहणी करण्यात यावी. जर महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती गरजेची नसेल तर तशी घोषणा करावी कि आता फक्त प्रवेश घ्या बाकी संबंधित विभाग सांभाळेल. तालुक्यातील महाविद्यालये मुलांकडून अवाजवी फीस घेऊन हजर नाही झाले तरी चालतील असे सांगून अंतर्गत मूल्यमापन कॉपीयुक्त करताना दिसून येत आहे याकडे लक्ष कोण करणार.. परिणामी रोज उपस्थित राहणाऱ्या मुलांवर याचा परिणाम होताना दिसून येत असल्याची चर्चा विद्यार्थ्यात बघावयास मिळत आहे. तालुक्यातील बऱ्याच शाळा व महाविद्यालय येथे विज्ञान प्रयोग शाळा उपलब्ध असून सुद्धा याचा लाभ येथील विदयार्थ्यांना भेटत नसून काही महाविद्यालयात तर विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध नाहीच. महाविद्यालयात विज्ञान शाखेला मान्यता देताना प्रयोग शाळा महत्वाची नसते का. वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करायचा असेल तर संबंधित विभागाने अशा शाळा महाविद्यालयांची तपासणी करून कारवाई करावी अशी चर्चा विद्यार्थी व पालक यांच्यात बघावयास मिळत आहे.

# सोयगाव शेतकऱ्यांना भरपाईचे अनुदान एकाच टप्प्यात देणार

## तहसीलदार रमेश जसवंत यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात यंदाच्या अतिवृष्टीच्या नुकसानीच्या अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या ठेत खात्यावर एकाच वेळी मिळणार असून अनुदानाचा रक्कमेत टप्पे पडू नये, यासाठी तालुका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दखल घेतली असल्याचे तहसीलदार रमेश जसवंत यांनी बोलताना सांगितले.मदत जाहीर केली होती. यावर्षी तालुका प्रशासनाने दिलेल्या नुकसानीच्या अनुदानाच्या पद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे एकदाच पूर्ण रक्कम शेतकऱ्यांना खात्यावर मागील वर्षीच्या नुकसानीच्या प्राप्त होणार आहे. तालुक्यात जिल्हा आपत्ती परतीच्या पावसाने व अतिवृष्टीच्या व्यवस्थापन विभागाने दोन टप्प्यात पावसाने ३६ हजार ४६८ हेक्टरवर क्षेत्र बाधित झाले असून ३३ हजार ९८० नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना यंदा तेरा हजार सहाशे रुपये प्रमाणे शेतकऱ्यांना मिळणार आहे. पन्नास कोटी ५९ लक्ष इतकी रक्कम ३३ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे यंदाच्या नुकसानीच्या मदतीसाठी टप्पे पडणार नसून पूर्ण रक्कम शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.



""शेतकऱ्यांना हि मदत नोव्हेंबर अखेर पर्यंत मिळणार तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेताचे नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले आहे अशी माहिती सोयगाव तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांनी सांगितले. यामध्ये मका ९८० हेक्टर, कपाशी ३२ हजार ६८८ हेक्टर आणि सोयाबीन २८३१ हेक्टरवर बाधित झाले आहे.यासाठी तेरा हजार सहाशे रुपये प्रमाणे प्रतिहेक्टरी शेतकऱ्यांना मदत दिली जाणार आहे. पंधरा दिवसांत हि मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. असे सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांनी बोलताना सांगितले.

# जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणी करा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** धामोरी खुर्द ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद येथील उपसरपंच रवींद्र चव्हाण यांनी गावातील शाळेची गुणवत्ता सुधारावी म्हणून चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पालक सभा आयोजित केली होती. सदर पालक सभेत इतर पालकांनी मी बोलत असताना मला विचारणा केली की, तुमचा मुलगा तर खाजगी शाळेत आहे. तुमच्याकडून शाळा सुधारेल अशी अपेक्षा नाही. नैतिकता म्हणून मी माझा मुलगा हर्षवर्धन रवींद्र चव्हाण हा इयत्ता दुसरीच्या वर्गात लासुर स्टेशन येथील चाटे पब्लिक स्कूल मध्ये शिकत असताना, चालू शैक्षणिक वर्षात त्यास तिसरीच्या वर्गामध्ये गावातील जिल्हा परिषद शाळेत प्रवेश दिला. जेणेकरून गावातील शाळेत विशेष लक्ष देऊन गुणवत्ता सुधारली जाईल. गटशिक्षणाधिकारी आरख साहेब यांच्या उपस्थितीत तसेच आदर्श शिक्षक सनी गायकवाड तसेच व्याख्याते विशाल गायकवाड सर यांच्या उपस्थितीत पालक सभा देखील आयोजित करून शिक्षकांना गुणवत्ता सुधारणे बाबत वेळोवेळी सूचना केल्या. परंतु या पालक सभेनंतर आमच्या मुख्याध्यापकांना माझ्यासह पालकांनी वेळोवेळी सूचना करूनही पालक सभा आयोजित केलेल्या नाहीत. माझा मुलगा चाटे पब्लिक स्कूल मध्ये असताना इयत्ता तिसरीत जिल्हा परिषद शाळा धामोरी खुर्द येथे प्रवेश घेतल्यानंतर त्याच्या गुणवत्तेमध्ये प्रचंड घसरन झालेली आहे.मी प्रायोगिक तत्त्वावर गावातील इतरही जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली असता विशेष फरक जाणवला नाही. माझ्या मुलास खाजगी शाळेतून जिल्हा परिषद शाळेत प्रवेश दिल्याने त्याच्या गुणवत्तेत घसरण झाल्याने घरी नेहमी वाद होत आहेत की, विनाकारण खाजगी शाळेतून जिल्हा परिषद शाळेत मुलास प्रवेश दिला. गाव सुधारायचा नादात आपल्या मुलाचे आयुष्य बर्बाद होईल व त्यास फक्त तूम्ही जबाबदार असाल..... ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शेतकरी, गोरगरीब, मजूर, कामगारांची मुले शिक्षण घेत आहेत. यातील बहुतेक पालक हे अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या पाल्यांकडे ते लक्ष देऊ शकत नाही. याचा गैरफायदा जिल्हा परिषद शाळा घेत असून, या शाळांमधील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आहे. महोदय हीच परिस्थिती शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची असून, गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे आणि माझे जरी चांगले संबंध असले तरी कर्तव्यात ते कसूर करत आहेत ही माझी स्पष्ट आपणाकडे तक्रार आहेत. हीच परिस्थिती सर्वच जिल्हा परिषद शाळेत असून, या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे. म्हणून माझ्या धामोरी खुर्द जिल्हा परिषद शाळेतील तसेच लासुर स्टेशन, दायगाव डोणगाव, सुलतानाबाद, शिरेगाव,नारळा, रायपूर, पिंपळगाव,दिवशी, वरझडी, किन्हळ, दे-हळ, माळीवाडगाव, दिनवाडा, वैरागड, सनव, बाबुळगाव, पाडळसा या सर्वच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची आपण त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत विशेष यंत्रणा राबवून गुणवत्ता तपासणी करावी. जेणेकरून उर्वरित चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर पडू शकेल.




# समर्थ पॅनल म.वि.प्र. सेवक सोसायटीत तिसऱ्यांदा सत्तास्थानी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** शैक्षणिक क्षेत्रातील स्वच्छ सुंदर व पारदर्शक कारभारासाठी नावलौकिक मिळविलेल्या नाशिक जिल्ह्यातील मविप्र सेवक सोसायटी ची निवडणूक संपन्न झाली आहे. राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षण संस्था म्हणून नावलौकिक असलेल्या मराठा विद्याप्रसारक समाज शिक्षण संस्थेच्या सेवक सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत सुज्ञ मतदारांनी सत्ताधाऱ्यांच्या समर्थ पॅनलवर विश्वास दाखवत त्यांना तिसऱ्यांदा निवडून दिले असुन समर्थ पॅनलचे नेते तथा सेवक सोसायटीचे माजी सभापती नानासाहेब दाते, गुलाब भामरे, सुप्रिया सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनलने 18 पैकी 17 जागांवर दणदणीत विजय मिळविला आहे तर विरोधी गटाच्या सेवक पॅनलला अवघ्या एक जागेवर समाधान मानावे लागले आहे. मविप्र समाज सहकारी सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवार (दि.२३) रोजी मराठा हायस्कूल येथे ९०.४९ टक्के मतदान झाले. सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान झाल्यानंतर सायंकाळी ५ वाजेला के. डॉ. वसंतराव पवार सभागृहात मतमोजणीस प्रारंभ झाला. पहिल्या फेरीपासूनच मतदारांचा कल समर्थ पॅनलच्या दिशेने असल्याचे दिसून आले. इतर मागास प्रवर्ग अर्थात ओबीसी गटात बळीराम जाधव विजयी झाले. तर महिला राखीव गटात वैशाली कोकाटे व सुवर्णा



कोकाटे, भटक्या विमुक्त जाती-जमाती प्रवर्गात संजय नागरे, अनुसूचित जाती- जमाती प्रवर्गात किरण उघडे यांचा विजय झाला. राखीव प्रवर्गातील पाच निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वसाधारण गटातील सेवक १२ जागांसाठी रस्सीखेच रंगली. मात्र विरोधी पॅनलचे संजय शिंदे हे विजयी झाले. उर्वरीत सर्व जागांवर समर्थ पॅनलचे उमेदवार विजयी झाले. समर्थ पॅनलने सलग तिसऱ्यांदा विजय मिळविला असून नानासाहेब दाते, गुलाब भामरे व सुप्रिया सोनवणे यांनी पॅनलचे नेतृत्व केले या निवडणुकीत अनिल पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी जबाबदारी सांभाळली.

**विजयी उमेदवार व त्यांना मिळालेली मते कंसात पुढील प्रमाणे :** घोटेकर नंदकुमार सुकदेव (1889),आहेर सुनिल सखाराम (1824),पवार विनीत धर्मराज (1773), काळे सुनिल सखाराम (1761), ठाकरे मंगेश किसन (1734),जाधव ज्ञानेश्वर गणपतराव (1666), शिंदे संजय खंडेराव (1664), बोरसे मनिष शांताराम(1622), मोरे कृष्णराव गंगाधर(1608), भंडारे अनिल रामदास (1581),चांदोरे शांताराम बळवंत (1562), हयाळीज दत्तराज बापुराव (1551)

**भटक्या विमुक्त जाती व जमाती**
संजय नागरे (१६७४),

**महिला प्रतिनिधी---**
वैशाली कोकाटे (१७३९), सुवर्णा कोकाटे (१५३२), **अनुसूचित जाती व जमाती**
किरण उघडे- (१८६७)

**इतर मागासवर्गीय**
जाधव बळीराम (१६९९)

# सावंगीत महावितरणचा महाप्रकोप

## पूर्वसूचना न देता वीज मीटर कापणे सुरू, महिनाभराचे बिल थकीत असल्याचे कारण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या मनमानीचा महाकारभार आज, १६ नोव्हेंबरला दुपारी दिसून आला. दिवाळीच्या सुटीत अनेक जण बिल भरू शकले नाहीत, त्यानंतर आता दोन महिन्यांचे बिल ग्राहकांना आले आहे. त्याची बिल भरण्याची तारिख ५ डिसेंबर असताना महावितरणच्या टीमने सावंगीतील सारा परिवर्तनमध्ये येऊन मीटर कापण्याचा धडाका लावला. यामुळे वेळेत आणि नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागला. विशेष म्हणजे पथकातील कर्मचाऱ्यांनी ग्राहकांच्या विनंतीला धुडकारून अरेरावी केल्याचेही दिसून आले. त्यामुळे ग्राहकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. एकीकडे आकडे टाकून सर्रास वीज चोरी होत असताना त्याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करणाऱ्या महावितरणने नियमित बिल भरणाऱ्या सोसायट्यांकडे मोर्चा वळवला आहे. अवघ्या एक महिन्याचे बिल थकल्यानंतर आणि दुसऱ्या महिन्याचे बिल भरायची तारिखही अजून बरीच लांब असताना, दोन महिन्यांचे बिल एकाचवेळी



भरण्याची सोय असतानाही महावितरणने कोणतीही पूर्वसूचना न देता मीटर कापण्याचा धडाका लावला. सारा परिवर्तनमध्ये १०० टक्के वीजबिल वसुली आहे. दिवाळीमुळे बरेचसे कुटुंब बाहेरगावी होते. त्यामुळे बिल भरता आले नाही. त्यामुळे या महिन्यात दोन महिन्यांचे बिल अनेकांना आले आहे. ते भरण्याची अंतिम तारिख ५ डिसेंबर आहे. तरीही महावितरणचे महामनमानी पथक सारा परिवर्तनमध्ये येऊन धडकले. त्यांनी यादीनुसार एकेकाचे वीज मीटर कापणे सुरू केले. अचानक घरातील वीज गायब झाल्याने गृहिणींनी बाहेर येऊन पाहिले तर पथक मीटरचे कनेक्शन कापत असल्याचे दिसले. त्यांनी पथकाला विचारणा केली असता तुमचे बिल थकले आहे, तुम्हाला वेळेवर भरता येत नाही का, मेसेजकडे लक्ष देता येत नाही का, अशी उद्धव वागणूक गृहिणींसह अन्य ग्राहकांना पथकाकडून मिळाली. त्यामुळे गृहिणींनीही त्यांना धारेवर धरले. अनेक जण आकडे टाकून वीज वापरतात, त्यांच्यावर कारवाई करत नाही आणि आम्ही वेळेत बिल भरूनही आमचे कनेक्शन कापता, असा संताप ग्राहकांसह गृहिणींनी व्यक्त केला. त्यावर पथकातील एका उद्धव कर्मचाऱ्याने मग तुम्ही ग्रामीण भागात जाऊन राहा, असे उत्तर दिले. शेवटी अनेकांनी ऑन दी स्पॉट बिल भरून कनेक्शन चालू करून घेतले. मात्र महावितरणच्या कारभाराबद्दल संताप व्यक्त केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी किमान पूर्वसूचना देऊन पथक वीज मीटरचे कनेक्शन कापायला पाठवावे. अरेरावी करणाऱ्या पथकातील कर्मचाऱ्यांनाही ग्राहकांशी कसे वागावे, याचेही धडे द्यावेत, अशी मागणी गृहिणींसह ग्राहकांनी केली आहे.

# अल्पवयीन विद्यार्थीनीची चालत्या रिक्षातून उडी

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** दोन दिवसांपूर्वी रिक्षाचालकाच्या चाळ्यांना घाबरून अल्पवयीन विद्यार्थीनीने चालत्या रिक्षातून उडी मारल्या प्रकरणी क्रांतिचौक पोलिसांनी रिक्षाचालकाला पॉक्सो आणि विनयभन्गाच्या गुन्ह्यात आज (१५ नोव्हे) बेड्या ठोकल्या अशी माहिती पोलीस निरीक्षक डॉ, गणपत दराडे यांनी दिली. अकबर हमीद सय्यद (४०) रा. कासंबरी दर्गा पडेगाव असे अटक आरोपीचे नाव आहे १३ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वा. पीडिता ही गोपाळ टी परिसरातून शिवाजी हायस्कुल जवळ संकल्प क्लासेसकडे आरोपीच्या रिक्षातून निघाली होती दरम्यान रिक्षाचालकाने पीडितेशी अश्लील संवाद सुरु केला. त्यामळे संतप्त झालेल्या पीडितेने धावत्या रिक्षातून बाहेर उडी मारली त्यामुळे तिच्या डोक्याला गंभीर इजा झाली होती. दरम्यान आरोपी रिक्षाचालक पळून गेला हा प्रकार परिसरातील नागरिकांनी तिच्या वडलांना कळवल्यानंतर तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते ती १४ नोव्हेंबर रोजी शुद्धीवर आल्यावर क्रांतीचौकपोलिसांना ही माहिती देण्यात आली पोलीस निरीक्षक डॉ. गणपत दराडे यांनी गोपाल टी ते शिवाजी हायस्कुल परिसरातील ३५ सीसी टीव्ही फुटेज तपासले ११ रिक्षाचालकांची चौकशी करून शेवटी आरोपीचा माग काढला त्याला पडेगावातून चौकशीसाठी ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. वरील कारवाई पोलीस निरीक्षक डॉ, गणपत दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय विकास खटके, अमोल सोनवणे, महादेव गायकवाड पोलीस कर्मचारी संतोष मुदिराज यांनी पार पाडली.

# नांदुर मधमेश्वर अभयारण्यात दुसऱ्या मासिक प्रगणनेत ९१०३ पक्षांची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :**नांदुर मधमेश्वर वन्यजीव अभयारण्यात नोव्हेंबर २०२२ महिन्यातून व हंगामातील २ री मासिक पक्षी प्रगणना दिनांक १२/११/२०२२ रोजी सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत वनअधिकारी, कर्मचारी. स्थानिक गाईड, पक्षीमित्र, वन्यजीव अभ्यासक, स्वयंसेवक यांच्या मदतीने पुर्ण करण्यात आली. आप या प्रगणनेत चापडगाव, मांजरगाव, खानगावथडी, मध्येश्वरी गोदावरी नदीपात्र, कोठुरे, कुरूडगाव, काथरगांव, अशा एकूण ७ ठिकाणी केलेल्या पक्षी निरिक्षणात विविध पाणपक्षी व झाडांवरील गवताळ भागातील पक्षी असे ६९०५ पाणपक्षी व २१९८ झाडांवरील गवताळ भागातील पक्षी असे एकुण ९१०३ पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. या प्रगणनेत विदेशी



स्थलांतरित पक्ष्यांची नोंद झाली असुन पुढीलप्रमाणे कॉमन क्रेन, नॉर्दन शॉवलर, पिनटेल, गागंनो, युरेशियन 'व्हिजन, गडवाल, रुडी शेल डक, मार्श हॅरियर, मॉन्टेग्यु हॅरियर, ब्लु ब्रोड ब्लू चिक बी ईटर, तसेच स्थानिक स्थलांतरित पक्षी उघडया चोचीचा बगळा, जांभळा बगळा, राखी बगळा स्पॉट बिल डक, बिल, रिव्हर टन. कमळपक्षी, शेकाटया,जांभळी पाणकोंबडी, नदीसुरय आदी पक्षी आढळून आले आहे. पावसाळा लांबल्याने व थंडीचे आगमन उशिरा झाल्याने स्थलातरीत पक्ष्यांचे आगमन कमी प्रमाणत झाले आहे.



# देवरे विद्यालयात बिरसा मुंडा यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**विखरण :** श्री.आप्पासो आ.ध. देवरे माध्यमिक विद्यालय विखरण विद्यालयात जननायक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. मान्यवरांचे हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यालयाचे उपशिक्षक, कार्यक्रमाची वक्ते डी.बी.भारती यांनी बिरसा मुंडा यांचे जीवन चरित्राचा परिचय करून दिला. आदिवासी समाजातील तरुणांचे नेत्रुत्व करणारे कौशल्य प्रेरणादायी असून जनसामान्यांनी त्यांना जननायक ही पदवी बहाल केली.अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक, डी.डी.साळुंके यांनी बिरसा मुंडा यांनी तत्कालीन इंग्रजांविरुद्ध लढा देऊन आपल्या क्रांतिकारक विचारांनी लोक संघटीत करून लढा प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.पी.देवरे यांनी तर आभार एम.डी.नेरकर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाय.डी.बागुल, श्रीम.एस एच.गायकवाड, व्ही.बी.अहिरे,आर.एम.पाटील, श्रीम.एम.आर. भामरे,एस.जी.पाटील यांनी परिश्रम घेतले.

# जुनी पेन्शन योजना लागू करण्यास काँग्रेस कटिबद्ध : सुप्रिया श्रीनेत

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी



देशभरातून होत आहे. जनतेच्या मागणीचा सरकारने सहानुभुतीने विचार करुन त्याची अंमलबजावणी करायला हवी. काँग्रेस शासित राज्ये गुजरात व छत्तिसगडमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली असून गुजरात व हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेस सरकार आले तर तेथेही ही योजना लागू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. काँग्रेस पक्ष जुनी पेन्शन योजना लागू करण्यास कटीबद्ध आहे, असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाच्या सुप्रिया श्रीनेत यांनी स्पष्ट केले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी देशातील सद्य परिस्थितीचा उहापोह करत मोदी सरकावर टीकास्त्र सोडले. देशातील वाढती महागाई हा ज्वलंत मुद्दा असून मागील दहा महिन्यांपासून महागाईचा दर ६ टक्यापेक्षा जास्त आहे पण भाजपा सरकारला महागाई दिसत नाही. देशात महागाई नाही असे मोदी सरकारचे मंत्री सांगत आहेत तर काही जण अमेरिका, इंग्लंडमध्येही महागाई असल्याचे सांगून जबाबदारी झटकत आहेत. अमेरिका आणि इंग्लड येथील दरडोई उत्पन्न व महागाई यांचा व भारतातील परिस्थितीत फरक आहे. भारतात महागाई ही नफेखोरीमुळे वाढली आहे हा यातील फरक आहे. दाळ, तांदूळ, खाद्यतेल, आटा, दूध यावरही मोदी सरकारने जीएसटी लावला आहे. 'पकोडे तळा' असा सल्ला दिला जातो पण पकोड्यासाठी लागणारे बेसन, खाद्यतेल व गॅसच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. युपीए सरकारच्या काळात रुपया व डॉलरची किंमत ५४ रुपये होती आता ती ८४ रुपये झाली. आता रुपया घरसत असताना दिल्लीतील सरकारची व पंतप्रधानांची पत घसरत नाही क? असा प्रश्नही सुप्रिया श्रीनेत यांनी विचारला. भारत जोडो यात्रेत

**विदर्भ, मराठवाड्यातील रस्ते खराब . .**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर टीका करत जयराम रमेश म्हणले की, देशभरात दररोज शेकडो किलोमीटरचे रस्ते बांधतो, अशी वल्गणा करणाऱ्या गडकरींना विदर्भ, मराठवाड्यातील रस्ते बांधणी करता आले नाहीत . या भागातील रस्ते अत्यंत खराब आहेत, असे जयराम रमेश म्हणाले .

या पत्रकार परिषदेला प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सोशल मीडियाचे महाराष्ट्राचे प्रमुख विशाल मुत्तेमवार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या माध्यम विभागाच्या महिमा सिंह उपस्थित होत्या .

महागाई, बेरोजगारीसह अर्थव्यवस्थेचा प्रश्नही महत्वाचा मुद्दा आहे. अर्थव्यवस्थेची घसरगुंडी मोदी सरकारला थांबवता येत नाही, जनता महागाईने त्रस्त आहे पण पंतप्रधान मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यावर गप्प आहेत. अर्थव्यवस्थेची स्थिती नाजूक आहे. पण सरकार ते मान्यच करत नाही. दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याच्या वल्गणा करणारे आता ७५ हजार नोकऱ्या देत आहेत, ही तरुणांची फसवणूक आहे.

भारत जोडो यात्रेमध्ये भाजपाशासित राज्यात अडथळे आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणातही असे प्रयत्न झाले. पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून जाणीवपूर्क अडथळे निर्माण केले जात आहेत असा आरोप अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे अध्यक्ष जयराम रमेश यांनी केला. जयराम रमेश यांनी यावेळी मनरेगाच्या संदर्भात माहिती दिली. ही योजना अत्यंत महत्वपूर्ण असून युपीए सरकारने ती लागू करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यावरही टीका करण्यात आली होती, पैसा कोठून येणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेची खिल्ली उडवली होती पण आजही तीच योजना रोजगार देण्यास आधार ठरली आहे. अन्न सुरक्षा योजनेलाही नरेंद्र मोदी यांनी विरोध केला होता आता तीच योजना जनतेला धान्य पुरवण्यास उपयोगी ठरली आहे. मनरेगा ही महाराष्ट्रातील दृष्टे नेते वी. स. पागे यांच्या संकल्पनेतून बनलेल्या रोजगार हमी योजनेवर बेतलेली आहे, असे जयराम रमेश यांनी सांगितले.

# विद्यार्थीनीचा लैंगिक छळ; गुरुजीची चौकशी करा

## अप्पर पोलीस अधीक्षक व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापूर शहरातील एका शैक्षणिक संस्थेत इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीशी लैंगिक छळ व गैरवर्तणूक केल्याप्रकरणी नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी सुद्धा गेले होते तसेच शाळा परीसरात नातेवाईकांनी धुमाकूळ घातल्याचा व्हिडिओ प्रसारमाध्यमांवर बराच प्रसारित झाला होता. घडलेला प्रकार निंदनीय आहे याला वाचा फोडण्यासाठी औरंगाबाद येथील तरुण मोहम्मद इसा यासीन याने राज्य महिला आयोगाकडे संबंधित प्रकरणाची रितसर चौकशी करून कलम 354 व पोस्को अंतर्गत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. याच्या तक्रार अर्जाची दखल घेत राज्य महिला आयोगाने जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व अप्पर पोलीस अधीक्षक यांना पत्र पाठवून "सदर प्रकरण हे प्रथमदर्शनी गंभिर स्वरुपाचे व बालकांशी संबंधीत असल्याचे दिसून येते . करिता नियमानुसार सदर प्रकरणाची चौकशी करुन या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करुन त्याचा अहवाल परस्पर संबंधितांना कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास देण्यात यावी".असे पत्रात नमूद केले. या संबंधीत असलेल्या शाळेचे संस्था चालक व मुख्याध्यापक यांनी पीडित मुलीच्या घरच्यांवर दबाव आणून तक्रार न देण्याचे भाग पाडले अशी चर्चा शहरभर सुरू आहे. पण जगात दुष्कर्म करणाऱ्यास शिक्षा झालीच पाहिजे या हेतूने एक तरुण पुढें आला आहे. त्याच्या या भूमिकेमुळे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. राज्य महिला आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी होऊन सत्य समोर येईलच. या कारवाई कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चोरी उघडकीस; ९ लाख ५० हजारांच्या मुद्देमालासह चालक अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विश्वासू दरायव्हरने दीड महिन्यापूर्वी १० लाख रु चे सोन्याचांदीचे दागिने चोरल्या प्रकरणी जिनसी पोलिसांनी गुन्हा दाखल होताच २४ तासात आरोपीच्या मुसक्या आवळल्या पुंडलिक मुळे, रा. विजयनगर गारखेडा असे अटक आरोपीचे नाव आहे. तर सन्तराम कोंडीबा वाळके (५९) रा जिन्व्हेंशवर कॉलनी साखरे मंगल कार्यालयाजवळ असे फिर्यादीचे नाव आहे आरोपी मुळे हा वाळके यांच्याकडे गेल्या चार वर्षांपासून दरायव्हरचे काम करत होताघरातील १० लाख रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने गायब झाल्यानंतर दीड महिन्यानंतर फिर्यादी यांनी मुळे च्या विरोधात जिनसी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांनी तपासाला योग्य दिशा



देत घटनाक्रम तपासाला असता त्यांचा संशय वाळके यांचा चालक मुळे यांच्यावर येत होता त्याला विश्वासात घेत विचारले असता त्याने गुन्ह्याची कबुली देत मुद्देमाल पोलसांच्या हवाली केला वरील कारवाई पोलीस उपायुक्त शिलवन्त नांदेडकर, पोलीस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय अनिल मगरे पोलीस कर्मचारी नंदलाल चव्हाण ,बमनांत यांनी पार पाडली.

# थायलंड येथील बौद्ध भिक्खूंच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप

## भन्ते प्रा. सिटीचोक अचांग यांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी पुष्पगुच्छ देऊन केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** थायलंड देशातील बौद्ध धम्म गुरु भंतेजी प्राध्यापक सिटीचौक अचांग यांनी 13 रोजी सायंकाळी 5 वाजता फर्दापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्ध विहाराजवळ आगमन होताच फर्दापूर येथील बौद्ध उपासक, उपसिका यांनी रस्त्यावर पुष्पवृष्टी करून भन्तेजी यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी स्वतः हा बुद्धविहारास 2020 मध्ये दान केलेली 6 फुटांची बुद्ध मूर्ती जवळ सर्व उपासक, उपासिका यांनी त्रिसरण पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली. नंतर फर्दापूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी भन्ते प्रा. सिटीचोक अचांग यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर 90 विद्यार्थी, विद्यार्थ्यांना एक बॅग, 2 रजिस्टर, 1 वही, 1 चित्रकला बुक,1 कलर बॉक्स, खोडरबर, पेन्सिल बॉक्स,शॉपनर,पेन बॉक्स, शालेय साहित्यसह शिक्षणासाठी शिष्यवृत्ती म्हणून पाकीट रोख रक्कम वाटप करण्यात आले.

त्यावेळी कार्यक्रमाचे सर्व नियोजन धम्मसेवक विशाल शिंदे यांनी केले. निस्वार्थपणे जबाबदारी स्विकारून लहान मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. साहित्य वाटप करताना प्रत्येक लहान मुले, मुली यांना भन्तेजी प्राध्यापक सिटीचोक अचांग व ग्रामपंचायतचे माजी सदस्य भीमराव बोराडे, रमेश दामोदर, राजू शिंदे, यांच्या हस्ते 90 विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण साहित्य साहित्य वाटप करण्यात आले. त्यावेळी नितीन शिंदे, सुमित शिंदे, अभय दामोदर, विकी शिंदे, प्रा. आर. बी. जाधव, राहुल जाधव, सुजित म्हस्के, मोठया संख्येने बौद्ध उपासक, उपासिका, उपस्थित होते. 10 ब्लँकेट सुद्धा वाटप करण्यात आले. लकी भन्तेजी यांचा जीवन प्रवास हा गेल्या सहा वर्षांपासून भारतात वास्तव्यास आहे ते सध्या औरंगाबाद येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे जगप्रसिद्ध अजिंठा बुद्धलेणी, वेरूळ बुद्ध लेण्यांवर पीएचडी करीत आहे. अत्यन्त गरीब परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले. प्राध्यापक सिटीचोक अचांग हे



काही वर्षांपूर्वी अजिंठा लेणीला भेट देण्यासाठी आले असता फर्दापूर येथील बौद्ध उपासक विशाल शिंदे यांना सर्व देशातील भाषा बोलता येते असे नावाजलेले उपासक विशाल राजू शिंदे यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांच्याच माध्यमातून भंतेजी प्राध्यापक सिटीचोक अचांग, (थायलंड) हे दरवर्षी फर्दापूरला येतात व बौद्ध लहान मुले-मुले यांना आपल्या स्वखर्चांमधून शालेय शिक्षण साहित्य वाटप करत असतात. बौद्ध धर्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी औरंगाबाद येथे वास्तव्य करत आहेत भन्तेजी यांच्या कार्याबद्दल अनुमोदन व आभार पत्रकार प्रविण तायडे यांनी मानले.



पैठणमधील गवळी समाजाच्या पुढाकाराने सगर उत्सव उत्साहात पार पडला. म्हशी व रेड्यांचे विविध खेळ यानिमित्ताने रंगले. शिवराज पारिक यांच्या पुढाकाराने गागाभट्ट चौकात सगरचे आयोजन करण्यात आले होते.

# मानेगाव नवीन गावठाणसाठी 5 कोटी 46 लक्ष रुपये नव्याने मंजूर करून भूमिपूजन

## अखेर उपसरपंच शिवाजी पैसोडे यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील जिगाव प्रकल्प बाधित मानेगावच्या नवीन गावठाण साठी प्रशासनाकडून 5 कोटी 46 लक्ष रुपयांचे वाढीव कामांचे भूमिपूजन दिनांक 10 नोव्हेंबर 2022 रोजी सरपंच अलका गजानन मिरगे व उपसरपंच शिवाजी प्रभाकर पैसे यांच्या हस्ते करण्यात आले. अगोदरच मानेगाव नवीन गावठाण साठी दहा कोटी 78 लक्ष रुपयांचे कामे पूर्ण करण्यात आली होती व ती कामे पूर्ण करून तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी बुलढाणा सुनील शेळके, तहसीलदार विजय पाटील जिल्हा पुनर्वसन कार्यालय बुलढाणा, सुदर्शन राळेकर कार्यकारी अभियंता जिगाव प्रकल्प पुनर्वसन विभाग खामगाव, नीरज कनोज उपविभागीय अभियंता जिगाव प्रकल्प पुनर्वसन विभाग खामगाव या अधिकाऱ्यांनी दिनांक 29 जानेवारी 2021 रोजी भूखंड वाटप कार्यक्रम जाहीर केला होता मात्र त्या भूखंड वाटपाला विरोध करत मानेगाव उपसरपंच शिवाजी पैसोडे सह सरपंच पती गजानन मिरगे व इतर गावकऱ्यांनी कार्यक्रम दरम्यान प्रशासनास धारेवर धरत गावठाण मध्ये 18 नागरी सुविधांपैकी बहुतांश सुविधा उपलब्ध नसल्यामुळे व झालेली सर्व कामे निकृष्ट असल्यामुळे अगोदर सर्व निकृष्ट कामांची चौकशी करा व 18 नांगरी सुविधा उपलब्ध करा तरच, सर्व गावकरी भूखंड स्वीकारतील अशा आशयाचे निवेदन उपसरपंच श्री शिवाजी पैसोडे यांनी अधिकाऱ्यांना देऊन भूखंड वाटपावर बहिष्कार



टाकला होता. त्यामुळे प्रशासनास भूखंड वाटपाचा कार्यक्रम रद्द करावा लागला होता. एवढ्यावरच न थांबता शिवाजी पैसोडे यांनी तत्कालीन पालकमंत्री, पुनर्वसन मंत्री, जलसंपदा मंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे सतत पाठपुरावा केला व अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले व प्रशासनाने नवीन गावठाण साठी 5 कोटी 46 लक्ष रुपये इतका वाढीव निधीची कामे नव्याने मंजूर करून सरपंच अलका गजानन मिरगे व शिवाजी प्रभाकर पैसोडे यांच्या हस्ते नवीन कामांचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्या सुनंदा राऊतराये, अर्चना भिवटे, शांताबाई मेहेंगे, दुर्गा उगले, पो.पा. प्रमोद श्रीनाथ, संतोष फंड, सरपंच पती गजानन मिरगे, वासुदेव भालेराव, महादेव राऊतराये, किसन मिरगे, सहदेव फंड, गजानन वरणकार इत्यादी उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षकाची गळफास घेत आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात खळबळ जनक घटना घडली आहे. शहरातील



पोलिस प्रशिक्षण केंद्रातील पोलिस निरीक्षक प्रवीण विश्वनाथ कदम यांनी गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळी उघडकीस आली. आत्महत्येपूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहिली असून त्यात त्यांनी आत्महत्येस कुणालाही जवाबदार धरू नये, असा उल्लेखही केला आहे. प्रवीण कदम यांच्याकडे पोलिस प्रशिक्षण केंद्रातील खानावळची जवाबदारी होती शिवाय प्रशिक्षण केंद्रातील सह्याद्री इमारतीतील प्लॅट क्रमांक दोनमध्ये ते वास्तव्यास होते. धुळे पोलिस प्रशिक्षण केंद्रात ते 2019 पासून सेवेत होते व अलिकडेच त्यांच्या बदलीची शक्यताही वर्तवली जात होती. सकाळी कदम यांनी आपल्या नातेवाईकांना गुड मॉर्निंगचा संदेश पाठवला मात्र दिवसभर ते खोलीतून बाहेर पडलेच नाही मात्र सायंकाळच्या सुमारास त्यांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले . शहर पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलिस निरीक्षक नितीन देशमुख व सहकाऱ्यांनी धाव घेत पाहणी केली. या प्रकरणी शहर पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आत्महत्येपूर्वी पोलिस निरीक्षक प्रवीण कदम यांनी सुसाईड नोट लिहिली असून त्यात आत्महत्येस कुणालाही जवाबदार धरू नये, असा उल्लेख केला आहे. तसेच एका अपघाताच्या गुन्ह्याचा योग्य तपास झाला नसल्याचीही खंत व्यक्त केल्याचे समजते . निरीक्षक कदम यांच्या पश्चात पत्नी , मुलगा व मुलगी असा परीवार आहे.



# शासकीय डिजिटल ग्रंथालय घनसावंगी येथे क्रांतिकारक बिरसा मुंडा यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** शासकीय डिजिटल ग्रंथालय घनसावंगी येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळेस मानसिक आरोग्य तज्ञ नखाते सर यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य विषयी मार्गदर्शन केले.

उपस्थित वाचक जयेश होशुरकर, विशाल घायतडक, विशाल कोळे व शुभम राठोड, गौरव जाधव, विष्णू दशरथे, माऊली मोटे, अलीम शेख, बाबासाहेब गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, सतीश गायकवाड, सतीश गायकवाड, खोजे कादंबरी, आरती सोनवणे, आदित्य कोळे, किरण थोरात, रोहन कोळी, पवार एडी, किरण खरात, भगवान सुरडकर, गोपाल महेश, गौरव जाधव, लोंढे तसेच ग्रंथालयीन कर्मचारी राजेंद्र पगारे यांनी जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.



# मुख्यमंत्र्यांकडून प्रकाश आंबेडकरांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युतीची चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आंबेडकरांची भेट घेतली. यानंतर तर्कवितर्कांना उधाण आलं आहे. मुंबईतील राजगृह येथे प्रकाश आंबेडकरांची भेट घेतल्यानंतर एकनाथ शिंदेंनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यात त्यांनी या भेटीत काय झालं हे सांगितलं. ते बुधवारी (१६ नोव्हेंबर) मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. एकनाथ शिंदे म्हणाले, "मी प्रकाश आंबेडकर यांची सदिच्छा भेट घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पवित्र



झालेली ही वास्तू पाहिली. यात कोणतंही राजकारण नाही. कृपया गैरसमज करून घेऊ नका. ही निव्वळ आणि निव्वळ सदिच्छा भेट होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या देशाचं भूषण आहे. त्यांचं वास्तव्य असलेली ही वास्तू पाहिली आणि सदिच्छा भेट दिली, अशी माहिती एकनाथ शिंदेंनी दिली.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, "राजगृहाची ही इमारत बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतून उभी राहिली आहे. आर्किटेक्चर नसतानाही बाबासाहेबांनी कोणत्याही खांबाशिवाय उभी केली. राजगृहमध्ये बाबासाहेबांच्या वाचनाची खोली, अभ्यासाचा टेबल, बसण्याची खुर्ची, सर्व पुस्तकं आणि इतर सर्व बाबासाहेबांच्या वापरातील वस्तू पाहिल्या. त्या आजही जशाच्या तशा आहेत. हा आपला ऐतिहासिक ठेवा आहे."

## विनायक मेटे मृत्यूप्रकरणी सीआयडीच्या हाती पुरावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसंग्रामचे प्रमुख विनायक मेटे यांच्या मृत्यूप्रकरणात सीआयडीच्या हाती सबळ पुरावे आले आहेत. त्यानंतर सीआयडीने विनायक मेटे यांचा वाहन चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवला आहे. रसायनी पोलीस स्टेशनमध्ये कलम ३०४ (२) नुसार या गुन्ह्याची नोंद झाली आहे. सीआयडीकडून या प्रकरणाचा तपास सुरू होता. तपासात विनायक मेटेंची गाडी ज्या मार्गाने गेली त्या मार्गावरील सीसीटीव्ही तपासण्यात आले. याशिवाय तज्ज्ञांची एक समिती तयार करून त्यांच्याकडूनही याप्रकरणी मतं घेतली गेली. या समितीत आयआरबीचे अभियंता आणि इतरांचा समावेश होता.

## छगन भुजबळांची सरकारवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात भाजपाच्या महिला पदाधिकाऱ्याने विनयभंगाचा गुन्हा दाखल केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चांगलाच आक्रमक झाल्याचे बघायला मिळते आहे. शिंदे-फडणवीस सरकारकडून दपडशाहीचे राजकारण सुरू असून आव्हाडांविरोधात खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप राष्ट्रवादीकडून करण्यात येत आहे. भुजबळ यांनीही या मुद्द्यावरून शिंदे सरकारवर टीका केली आहे. "गर्दीत कोणलाही धक्का लागू शकतो. एखाद्यावेळी आपण हात लावून बाजुला सरकायला सांगतो, यात कसला आला विनयभंग? अशा प्रकारे जर विनयभंगाचे गुन्हे दाखल होत असतील, तर लोकलमध्ये रोज महिलांना धक्के लागल्याच्या घटना घडत असतात, मग त्यांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल करायचा का? अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी शिंदे सरकारवर केली आहे.

## प्रतापगडावर कबर परिसरात डबर, माती हटविण्याचे काम सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** प्रतापगडाच्या पायथ्याला अफझल खान कबर परिसरात आज सलग चौथ्या दिवशी महसूल विभाग व वन विभागाच्या संयुक्तिक कारवाईमध्ये संपूर्ण परिसरातील पाडलेल्या बांधकामांचे डबर, माती, पत्रे व लोखंड हटविण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. अफजलखान कबरी व्यतिरिक्त सापडलेल्या कबरी बाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी शिवप्रेमींकडून शासनाकडे करण्यात आली. दरम्यान प्रतापगडावर पुन्हा बंदोबस्त कडक करण्यात आला आहे. अद्याप संपुर्ण परिसरात कडक पोलिस बंदोबस्त आहे. कबर परीसरात डबर, माती ,मलबा हटविण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. अनेक वर्षे प्रलंबित असलेली कारवाई पूर्ण होत असल्याने शिवप्रेमींमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ज्या चौथऱ्यावर अफझल खान कबर आहे तेथील सुमारे चार फूट चौथरा वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने हा चौथरा मोकळा करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु करण्यात आले आहे. आज अफझल खान व सय्यद बंडा यांच्या कबरी वरील चादर व मोरपीस हटवून खऱ्या अर्थाने हा परिसर अतिक्रमण व उदात्तीकरण यापासून मुक्त करण्यात आला आहे. कबरीवरील



मजबूत बांधकाम पाडून कबर उघडे करुन चार दिवस उलटले तरी कबर जवळ अद्याप मोठ्या प्रमाणात अत्तराचा घमघमाट कमी झालेला दिसत नाही. संपुर्ण परिसर कायमस्वरूपी अतिक्रमण विरहीत व उदात्तीकरण होऊ नये यासाठी शासनाने या परिसरातील सुंदर असे स्मारक, बगीचा व यांची योग्य देखभाल ठेवण्यासाठी समिती नेमावी अशी मागणी शिवप्रेमींकडून होत आहे.महाबळेश्वर तालुक्यातील किल्ले प्रतापगडावर सध्या सुरू असलेले जमावबंदीचे कलम १४४ मागे घ्यावे व प्रतापगडावर पर्यटकांना जाण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी प्रतापगड उत्सव समितीच्यावतीने करण्यात आली आहे. समितीच्या निमंत्रक श्रीमती विजयाताई भोसले, समितीचे अध्यक्ष गणेश जाधव, स्वप्नील भिलारे, प्रथमेश ढोणे, राहुल पवार, तुकाराम तुपे, पंकज शिंदे, सुमित भोसले, विवेक भोसले आदींनी वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र जाधव यांना निवेदन देण्यात आले.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा येथील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सन १९९५ ते १९९७ या दोन वर्षात डीएडला असणाऱ्या बॅचचा मेळावा (गेट-टुगेदर) दिनांक १३/११/२०२२ रोजी हॉटेल बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी, बुलढाणा येथे संपन्न झाला. सविस्तर वृत्त असे की, शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा येथे २५ वर्षांपूर्वी शिकणाऱ्या ८० पैकी ६५ ते ७० विद्यार्थ्यांचा स्नेह-भेट मेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या उद्‌घाटनासाठी व प्रमुख पाहुणे म्हणून त्याच बॅचला शिकवणाऱ्या काही प्राध्यापकांना प्राचारण करण्यात आले होते. त्यामध्ये प्रा. ए.के. सरदार, प्रा. खरात, प्रा. एम. आर. जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून भिमराव परघरमोल यांनी लिहिलेल्या बुद्ध शासन या द्वितीय पुष्पाचे प्रकाशन (विमोचन) करून अलकनंदा क्रिएशनने बनवलेला मैत्रीचा भलामोठा केक कापण्यात आला. त्यानंतर उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार व्यक्त करत आपल्या माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अल्पोपहार ब्रेकनंतर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या प्रत्येकाने मंचकावरून आपापला परिचय देऊन शैक्षणिक तथा अध्यापनासंबंधी अनुभव मांडले. कार्यक्रमांमध्ये पुस्तकाचे प्रकाशन, मैत्री वरील कविता, कविता रूपाने सादर केलेले प्रास्ताविक, काही गीतांचे सादरीकरण, अनोख्या पद्धतीने सादर केलेले सूत्रसंचालन, उपस्थितांपैकी एक शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त, काही राजकारणामध्ये सक्रिय, तर काहींनी मागील दहा-पंधरा वर्षापासून गावाचे सरपंच पद सांभाळत आपला नावलौकिक उंचावला. या सर्व गोष्टी कार्यक्रमच्या आकर्षणाचा



विषय ठरल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन नरवाडे तर सूत्रसंचालन गजानन बाहेकर, विनोद ठाकरे आणि अलकनंदा राजपूत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बुलढाणा येथे राहणारे गजानन बाहेकर, सुनील गवई, सुभाष चव्हाण, गजानन नरवाडे व इतर बुलढाणेकरांनी अथक यांनी केले.



## प्रकाश भिसे यांचा वंचितमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जा) :** तालुक्यातील पिंपळगाव काळे सर्कल मधील तरुण तडफदार युवा नेतृत्व श्री प्रकाश विठ्ठलराव भिसे यांचा बहुजन हृदय सम्राट बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वामध्ये अनेक कार्यकर्त्यांसह वंचित बहुजन आघाडी मध्ये जाहीर पक्ष प्रवेश दि 11-11-2022 रोजी अकोला येथील 'यशवंत भवन' येथे करण्यात आला. तालुक्यातील सर्वात कमी वयात व अल्पावधी काळातच नावारूपाला आलेले नेतृत्व म्हणून प्रकाश भिसे यांची ओळख आहे विशेषता गोरगरीब निराधार लोकांच्या मदतीला सदैव तत्पर असलेला युवा समाजसेवक आणि भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा मध्ये जिल्हा सचिव पदावर कार्यरत असताना पदाचा राजीनामा देऊन वंचित बहुजन आघाडी मध्ये पक्षप्रवेश करण्यात आला. त्यावेळी प्रकाश भिसे यांच्यासह भास्कर वाघमारे राजू तायडे ,शेख समीर कुरेशी ,राष्ट्रवादी पक्षाचे शहर अध्यक्ष श्रीकृष्ण झोडणे, किशोर भगेवार, गजानन जळके प्रवीण चिपडे सुधाकर सावरकर आकाश कवडे विशाल भालेकर इत्यादींचा पक्षप्रवेश झाला.

प्रवेश करते वेळी जिल्हा प्रभारी प्रदीपजी वानखडे, जिल्हा महासचिव अँड अनिलजी इखारे, जिल्हा महासचिव (घाटावरील), प्रशांतजी वाघोदे व वंचित चे नेते माजी जि.प.अध्यक्ष अकोला बालमुकुंदजी भिरड, प्रा. सोनेकरजी सर प्रा श्रीकृष्णजी गवई, तालुका उपाध्यक्ष जळगाव जामोद आदी पदाधिकारी उपस्थित होते आदि सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले श्री रामकृष्णजी रजाणे साहेब जिल्हा कार्याध्यक्ष बुलढाणा यांनी सुद्धा मुलाचे मार्गदर्शन केले तसेच गणेश भाऊ चौकशे जिल्हा अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बुलढाणा आणि ता.अध्यक्ष श्री संतोषजी गवई. यांचे सुद्धा मार्गदर्शन लाभले यावेळी सर्कल मधील रवींद्र जाधव सुधाकर जी घटे, जयकुमार डोंगरदिवे अमोल हिवराळे अमोल बांगर कार्यकर्ते उपस्थित होते


आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# विद्यार्थ्यांनी अनुभवले निवडणूक अनुभव...!

## पांडुरंग इंग्लिश स्कूलच्या जी.एस.पदी साई प्रसाद निकम आणि धनश्री जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** भारतीय लोकशाही व निवडणूक प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्देशाने वैजापुर तालुक्यातील  तलवाडा येथील पांडुरंग इंग्लिश स्कूल शाळेमध्ये लोशाही पद्धतीने विद्यार्थी निवडणूक घेण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करताना प्रत्येक विद्यार्थ्यांने मतदान केले. आजचे विद्यार्थी हे भावी मतदार असल्याने त्यांना भावी काळात लोकशाही व त्या लोकशाहीचा मुख्य घटक असलेले मतदान ही प्रक्रिया कशी पार पडते हे समजण्यासाठी शाळेचे अध्यक्ष संतोष सुर्यवंशी यांच्या पुढाकाराने अशा पद्धतीची निवडणूक घेण्यात आली.



लोकशाहीप्रती सजग करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मतदान करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. पांडुरंग इंग्लिश स्कूल शाळेत लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबवून जनरल सेक्रेटरी (GS) ची निवडणूक ता 16 रोजी घेण्यात आली या निवडणुकीत मुलांमध्ये साई प्रसाद जगदीश निकम 5 वी तर मुली मधून धनश्री संतोष जाधव विजयी झाले.  2 रि ते सहावी असे एकूण 102 मतदार यांनी मतदान केले. विद्यार्थी समोरच मतमोजणी करण्यात आली. दोन दिवस प्रचार चालला 2 जागांसाठी एकूण 12 उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. उमेदवार  प्रणव मगर, सोहम मगर, साई प्रसाद निकम, अक्षय निघूट, साई निकम, हर्ष सोनवणे, देवयानी पवार, धनश्री जाधव, संस्कृती एखंडे, अमृता सोनवणे, कावेरी जगताप, आराधया सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज केले. निवडणूक आयोग, उमेदवारी अर्ज दाखल करणे, माघार, अर्ज छाननी आणि मतदान कसे करायचे या बाबतीत माहिती विद्यार्थ्यांना या उपक्रमात मिळाली. निवडणूक निकालानंतर विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. विजयी उमेदवाराचे सत्कार करण्यात आला तर पराभूत उमेदवार यांना सुद्धा भेट वस्तू देवून प्रोत्साहित करण्यात आले. या निवडणुकीत या निवडणुकीत साईनाथ वाघ, निखिल वाघ, दिपाली तळेकर, राणी सुर्यवंशी, वैशाली नारळे, कीर्ती कुंदे , तणूजा कुंदे, योगिता सोनवणे शिक्षकांनी सहकार्य केले.

> निवडणूक प्रक्रिया, निवडणूक आयोगाचे काम या बाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्देशाने आम्ही शाळेत निवडणूक घेतली . यातून विद्यार्थ्यांना सामाजिक न्यान मिळते याचा फायदा विद्यार्थ्यांना पुढील काळात होईल .
> **– संतोष सूर्यवंशी अध्यक्ष पांडुरंग इंग्लिश स्कूल**

# थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू

## ग्राहकांना वीजबिल भरण्याचे महावितरणचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीजबिल वसुलीची मोहीम राबवून थकबाकी वसूल करण्याचे व थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा त्वरित खंडित करण्याचे आदेश महावितरणने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत. औरंगाबाद परिमंडलात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, कृषिपंप, सार्वजनिक पाणीपुरवठा, पथदिवे व इतर अशा सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडे ५ हजार ३७७ कोटींचे वीजबिल थकले आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यास सुरुवात केली आहे. वीजबिलांच्या थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. आता जर ग्राहकांनी वीज बिल भरले नाही तर वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय महावितरणसमोर कोणताच पर्याय उरलेला नाही, असे महावितरणे म्हटले आहे. ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणला वीज खरेदीसाठी पुरवठादारांना रोजच पैसे द्यावे लागतात. प्रचंड वाढलेल्या थकबाकीमुळे आता यापुढे थकबाकी वसूल करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना मोहिमा राबविण्याचे निर्देश महावितरणने दिले असून थकबाकी वसुलीत कसूर करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाईचे संकेतही दिले आहे. त्यामुळे थकबाकीदार ग्राहकांनी आपल्या वीज बिलाचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. औरंगाबाद शहर मंडलात वीजबिलांची १३८ कोटी ९१ लाख, औरंगाबाद ग्रामीण मंडलात ३ हजार २०६ कोटी २७ लाख तर जालना मंडलात २ हजार ३२ कोटी ३५ लाख रुपयांची थकबाकी आहे. महावितरणने सर्वच यंत्रणा थकबाकी वसुलीसाठी लावली असून, थकबाकीदारांविरोधात यापुढेही धडक मोहीम सुरू राहणार आहे. वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई व संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी वीजबिलांचा त्वरित भरणा करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. वीजबिलांचा भरण्यासाठी स्थानिक वीजबिल भरणा केंद्रांसह व घरबसल्या ऑनलाईन पेमेंटसाठी महावितरणची ही वेबसाईट तसेच महावितरणच्या मोबाईल ॲपचा पर्याय उपलब्ध असल्याचे महावितरणने कळवले आहे.याबरोबरच वीजचोरी करणाऱ्यांविरोधातही महावितरणने कारवाईचा बडगा उगारला आहे. एप्रिल ते सप्टेंबर-२०२२ या सहा महिन्यांत औरंगाबाद परिमंडलात २१३८ ग्राहकांवर वीजचोरीची कारवाई करण्यात आली आहे. यात १७४ जणांवर विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



# 'नॅशनल चिकन डे' उत्साहात साजरा

## तीन दिवस १०५ दुकानांतून सवलतीच्या दरात चिकनचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** भारतीय कुक्कुटपालनाचे जनक पद्मश्री डॉ. बी. व्ही. राव यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित देशव्यापी जनजागृती अभियानांतर्गत 'नॅशनल चिकन डे' उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून 'चिकन डे'च्या निमित्ताने शहराच्या विविध भागातील १०० पेक्षा अधिक दुकानांतून १८, १९ व २० नोव्हेंबर २०२२ या तीन दिवशी १० टक्के सवलतीत चिकन वितरित करण्यात येत आहे. फर्ग्युसन रस्त्यावरील वेंकीज एक्स्प्रेस येथे पोल्ट्री फार्मर्स अँड ब्रीडर्स असोसिएशनचे अध्यक्ष सी. वसंतकुमार यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ झाला. यावेळी असोसिएशनचे संजय थोपटे, वेंकीज एक्सप्रेसचे किरण गुंजाळ आदी उपस्थित होते. वसंतकुमार म्हणाले, "सुदृढ आरोग्यासाठी चिकन पोषक आहे. त्यातून मिळणारे प्रोटीन लाभदायक असतात. आठवड्यातून पाच-सहा वेळा चिकन खाल्ले, तर आपली प्रतिकार क्षमता चांगली राहते. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी चिकन खावे, यासाठी जनजागृती केली जात आहे. लोकांमध्ये चिकनबाबत जागृती होण्याच्या उद्देशाने आज हा विविध राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने दिवस साजरा होत आहे. तीन दिवस ७५ दुकानातून स्वस्त दरात चिकन विक्री, जागृतीपर कार्यक्रम, प्रशिक्षण आदी उपक्रमांचे आयोजन या अभियानात केले आहे. किरण गुंजाळ म्हणाले की, चिकनमधून प्रोटिन्स भरपूर प्रमाणात मिळतात, जे आपल्या शरीरासाठी पोषक असते. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी चिकन, अंडी उपयुक्त आहे. लोकांनी मनात कोणतीही भीती न ठेवता चिकनचे सेवन करावे. आज नॅशनल चिकन डेच्या निमित्ताने आम्ही ग्राहकांना सवलत देत असल्याने चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# मटणाच्या सुपमध्ये भात आल्याने वेटरचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी- चिंचवड :** पिंपरी- चिंचवड शहरातील पिंपळे सौदागर येथे अत्यंत किरकोळ कारणावरून मटण खानावळीतील १९ वर्षीय वेटरचा खून करण्यात आला आहे. मटणाच्या सूपमध्ये भात आला या कारणावरून दोन तरुणांनी वेटरला शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या घटनेत एकाचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला असून दोघे जण जखमी आहेत. आरोपी फरार असून सांगवी पोलिस या आरोपींचा शोध घेत आहेत.

मंगेश संजय पोस्ते वय- १९ असे खून झालेल्या वेटरचे नाव आहे. तर, अजित अमूत मुठकुळे वय- ३२, सचिन सुभाष भवर वय- २२ अशी जखमी व्यक्तींची नावे आहेत. विजयराज वाघिरे आणि त्याचा साथीदारावर खुना प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल महादू रजाळे यांनी सांगवी पोलिसात तक्रार दिली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिंदे -फडणवीसांनी दिलेल्या चिठ्ठ्यांवर, पंतप्रधान मोदी टेलिप्रॉम्प्टरवर बोलतात

## सुषमा अंधारेंचा खोचक टोला

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाराष्ट्रातून 7 प्रकल्प बाहेर गेले, लाखो लोकांचे रोजगार गेले. गुजरातला प्रकल्प नेऊन मुंबईला दुबळे करून गुजरातला ड्रीम सिटी करायचा प्रयत्न असल्याचा हल्लाबोल सुषमा अंधारे यांनी केला. कोल्हापूरमध्ये महाप्रबोधन यात्रेतून शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर कडाडून हल्ला चढवला. महाराष्ट्रामध्ये जातीचे राजकारण सुरु असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शिवसेनेतून अनेकजण आले गेले, पण शिवसेनाला काही फरक पडला नाही, राज ठाकरे, भुजबळ यांनी शिवसेना संपवायचा कधी प्रयत्न केला नाही. सुषमा अंधारे म्हणाल्या की, मोदी टेलिप्रॉम्प्टरवर बोलतात आणि एकनाथ शिंदे फडणवीसांनी दिलेल्या चिठ्ठ्यांवर बोलतात, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला. अंधारे म्हणाल्या की, माझ्या उंचीवरुनही टीका केली गेली, पण फडणवीस यांची उंची आणि वजनही माहीत आहे, पण फडणवीस यांनी नेमका कशाचा त्याग केला?

त्या पुढे म्हणाल्या की, मी राष्ट्रवादीची कधीही सदस्य नव्हते, तरीही गुलाबराव पाटील म्हणतात, मी राष्ट्रवादीतून आले. भाजपकडे स्वतःचे असे काय होते? काँग्रेस-राष्ट्रवादीच्या लेकरांना मांडीवर घेऊन भाजपने त्यांना मोठे केले. खोके शब्द उचारला, तर कायदेशीर कारवाई करणार असे म्हटले जाते.

दिपक केसरकर यांचा पाहुणचार सावंतवाडीत करणार

सुषमा अंधारे यांनी कोल्हापूरचे पालकमंत्री दीपक केसरकर यांचाही समाचार घेतला. त्या म्हणाल्या की, केसरकर शिक्षण मंत्री आणि शिक्षण काय तर एक्स्पोर्ट मॅनेजमेंटचा डिप्लोमा केला. म्हणून आमदार एक्स्पोर्ट करण्याचे काम मुख्यमंत्री यांनी केसरकर यांना दिले. त्यांचा पाहुणचार सावंतवाडीत घेणार आहे.